# अर्थबोध पत्रिका

अंक - ३ व ४ एप्रिल १९९९

## 'स्वदेशी व जागतिकीकरण' विशेषांक

महत्वाच्या आर्थिक, राजकीय, व सामाजिक
विषयावरील माहिती सर्वापर्यंत पोचवणारे माध्यम

---

**भारतीय अर्थविज्ञान वर्धिनी**
'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट रोड, पुणे ४११ ०१६.

(केवळ खाजगी वितरणासाठी)

## अर्थबोध पत्रिके विषयी ...

भारतीय अर्थविज्ञान वर्धिनी या संस्थेतर्फे "अर्थबोध पत्रिका" हे आर्थिक, सामाजिक, व राजकीय विषयांवरील माहितीपूर्ण लेख देणारे नियतकालिक प्रकाशित करण्यात येत आहे. सर्वसामान्य मराठी वाचकांना आर्थिक, सामाजिक, व राजकीय विषयांवरील अभ्यासपूर्ण माहिती देणे, एखाद्या विषयाच्या सर्व बाजू निष्पक्षपणे समजावून देणे, व विविध समस्यांच्या संदर्भातील सैद्धांतिक व संकल्पनात्मक बाबी समजावून देणे हे यामागील उद्देश आहेत. अशा विषयांवरील सखोल माहिती व सैद्धांतिक बैठक असणारे विश्लेषणात्मक लेख छापणारी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरची इंग्रजी भाषेतील नियतकालिके व पुस्तके मराठी वाचकांपर्यंत पोहचत नाहीत. अशा नियतकालिकांतील माहिती व विश्लेषण यांच्या आधारे लिहिलेल्या लेखांचा अर्थबोध पत्रिकेत समावेश असेल.

प्रथम वर्षाच्या कालावधीत (नोव्हेंबर १९९८ ते डिसेंबर १९९९) "अर्थबोध पत्रिके"चे सहा अंक काढण्यात येतील. या सहा अंकांसाठी मूल्य आकारण्यात येणार नाही. जानेवारी २००० पासून "अर्थबोध पत्रिका" मासिक अथवा द्वैमासिक स्वरूपात नियमितपणे प्रकाशित करण्याचा संस्थेचा मनोदय असून तेव्हा मात्र वार्षिक वर्गणी आकारली जाईल. यासंबंधीची सूचना पत्रिकेमध्येच योग्य वेळी प्रसिद्ध करण्यात येईल. अर्थबोध पत्रिकेच्या पत्त्यांच्या यादीत (mailing list) आपल्या किंवा आपल्या संस्थेच्या नावाचा समावेश करुन घेण्यासाठी कृपया संस्थेशी संपर्क साधावा.

अर्थबोध पत्रिका अंक ३ व ४, एप्रिल १९९९

**'स्वदेशी व जागतिकीकरण' विशेषांक**

*जादा प्रति हव्या असल्यास मनीऑर्डरने प्रत्येकी रुपये १०/- प्रमाणे संस्थेच्या नावाने देणगीमूल्य पाठवावे.*

भारतीय अर्थविज्ञान वर्धिनी, पुणे यांनी अक्षरजुळणी करुन व छापून खाजगी वितरणासाठी प्रसिध्द केले.

**मुद्रक** - एस. के. प्रिंटर्स,

परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे, ३०.

# अर्थबोध पत्रिका

**अंक - ३ व ४** **एप्रिल १९९९**

## 'स्वदेशी व जागतिकीकरण' विशेषांक

महत्वाच्या आर्थिक, राजकीय, व सामाजिक
विषयावरील माहिती सर्वापर्यंत पोचवणारे माध्यम

---

**भारतीय. अर्थविज्ञान वर्धिनी**

'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट रोड, पुणे ४११ ०१६.
फोन : ३५७१३२ / ३५७२१०

(केवळ खाजगी वितरणासाठी)

# प्रस्तावना

अर्थबोध पत्रिकेच्या ह्या अंकामध्ये आम्ही एक वेगळा प्रयोग करीत आहोत. विविध विषयावरील छोटे छोटे लेख देण्याऐवजी एका अंकात एकच विषय घेऊन त्याच्या विविध बाजू वाचकांसमोर मांडणे असा वेगळाच आकृतीबंध ह्या अंकासाठी आम्ही स्वीकारला आहे. शिवाय ह्या अंकातील लेखांचा भर मुख्यतः संकल्पनात्मक व सैद्धांतिक बाबीवर आहे.

स्वदेशी अथवा जागतिकीकरण ह्या विषयावर आज भारतीय समाजात विविध स्तरावर चर्चा चालू आहे. अशा महत्वाच्या विषयावरील चर्चेत सैद्धांतिक व संकल्पनात्मक बाबी समजून घेऊन नंतरच प्रत्यक्ष उपाययोजनेवर साधक बाधक चर्चा व्हायला हवी. दुर्दैवाने आज दोन्ही बाजूंकडून एकमेकांवर होणारे कडवे हल्ले व त्यावर माजलेले वादंग असे रूप ह्या चर्चेला येताना दिसते. ह्या वादंगात अनेकदा विविध दृष्टिकोणातून मांडलेले मुद्दे व तर्कवाद वाहून गेलेले दिसतात. कोणत्याही प्रकारच्या मूलतत्ववादांना (मग तो बाजारपेठी मूलतत्ववाद असो की सांस्कृतिक मूलतत्ववाद असो) ही चर्चा बळी न पडता त्यास तर्कपूर्ण वादाचे व विधायक संवादाचे स्वरूप येणे जनहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे. ह्या चर्चेमध्ये विविध दृष्टीकोणातून उपस्थित केले जाणारे समर्पक मुद्दे व तर्कवाद सर्वांसमोर आणून चर्चेला तार्किक अधिष्ठान देण्यामध्ये हातभार लावावा, हा ह्या अंकामागचा उद्देश आहे.

भारतीय अर्थविज्ञान वर्धिनीच्या चर्चागटाच्या बैठकीसाठी 'स्वदेशी / जागतिकीकरण' ह्या विषयावर विविध दृष्टीकोण मांडणारी टिपणे मागवण्यात आली होती. त्यांचे एक संकलन ह्या पुस्तिकेद्वारे आम्ही अर्थबोध पत्रिकेच्या वाचकांना ह्या अंकात सादर करीत आहोत. त्याशिवाय ह्या विषयावर चर्चागटाच्या बैठकीत झालेल्या चर्चेमध्ये उपस्थित करण्यात आलेल्या निवडक मुद्द्यांचे संकलन देखील ह्या अंकात अंतर्भूत करण्यात आले आहे. आधी नमूद केल्याप्रमाणे ह्या सर्व टिपणांमध्ये व संकलनामध्ये संकल्पनात्मक व सैद्धांतिक मुद्द्यावर मुख्यतः भर देण्यात आला आहे. पुस्तिकेच्या शेवटी श्री. राजीव साने ह्यांच्या एका लेखातील काही भागाचे संकलन सादर करण्यात आले आहे. त्याचे स्वरूप व उद्देश मात्र थोडेसे वेगळे आहेत. आज महाराष्ट्रात गावोगावी 'आझादी बचाओ आंदोलनाचे'

श्री. राजीव दीक्षित यांच्या भाषणांचा व ध्वनिमुद्रीत कॅसेट्सचा लोकांवर प्रभाव पडलेला आढळतो. बहुधा त्यांच्या आक्रमक वक्तृत्वाला भुलून त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांकडे व तर्कवादाकडे पुरेश्या चिकित्सकदृष्टीने पाहिले जात नाही. श्री. राजीव साने ह्यांनी श्री. दीक्षित यांच्या कॅसेट्स ऐकून त्यातील काही मुद्यांवर व दाव्यांवर केलेल्या टिपणांचे संकलन ह्या अंकाच्या शेवटी दिले आहे. त्यावरुन वाचकांना श्री. दीक्षित ह्यांच्या दाव्यातील सत्यतेची व मुद्यांच्या योग्यतेची यथार्थ कल्पना येण्यास मदत होईल.

स्वदेशी / जागतिकीकरण यासारख्या महत्त्वाच्या विषयासंदर्भात आजच्या आपल्या परिस्थितीला अनुरूप असे निर्णय एक समाज म्हणून आपल्याला घेता यावेत यासाठी मुद्देसूद व माहितीपूर्ण चर्चेची तीव्र गरज आज बऱ्याच जणांना जाणवते आहे. ती गरज या अंकामुळे काही अंशाने तरी भागेल अशी आशा वाटते.

डॉ. सुबोध वागळे
प्रभारी संचालक
भारतीय अर्थविज्ञान वर्धिनी, पुणे.

# अर्थबोध पत्रिका

अंक - ३ व ४ एप्रिल १९९९

## 'स्वदेशी व जागतिकीकरण' विशेषांक

## अनुक्रमणिका

१. 'स्वदेशी'तील चकवे व खरे स्वराज्य १
(डॉ. सुबोध वागळे)

२. स्वदेशी संबंधित अर्थशास्त्रीय संकल्पनांचे विवेचन १५
(श्री. राजीव साने)

३. जागतिकीकरण व भारतीय अर्थव्यवस्था २४
(डॉ. अनंत फडके)

४. अनावश्यक सदोष माल लादून घेणे म्हणजे जागतिकीकरण की काय! २८
(डॉ. वसंत श्री. पटवर्धन)

५. स्वदेशी व जागतिकीकरण ३७
(श्री. गजानन खातू)

६. स्वदेशीवरील चर्चेत उपस्थित झालेले मुद्दे ४४

७. राजीव दीक्षितांची स्वदेशी : अर्थ आणि वैयर्थ्य ४९
(श्री. राजीव साने)

**सूचना** - या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संस्थेच्या पत्यावर पाठवावेत अशी आपणास विनंती आहे.

# 'स्वदेशी'तील चकवे व खरे स्वराज्य

**डॉ. सुबोध वागळे**

*[ हे टिपण याआधी "समतेसाठी न्यायासाठी आंदोलन" ह्या मासिकाच्या ऑगस्ट ९८ च्या विशेषांकात प्रसिद्ध झाले होते. त्यावर काही संस्कार करुन हे टिपण येथे पुनर्मुद्रित करीत आहोत. भारतीय अर्थविज्ञान वर्धिनीच्या चर्चागटाच्या "स्वदेशी" वरील बैठकीसाठी अभ्याससाहित्य म्हणून मूळ टिपणाच्या प्रति वितरीत करण्यात आल्या होत्या. ]*

'स्वदेशी' शब्दाला एक इतिहास तर आहेच पण वर्तमानकाळातही त्याला एक महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. वर्तमानकाळातील स्वदेशीचे समर्थक सध्याच्या स्वदेशीची नाळ इतिहासाशी जोडतानाच इतिहासातील स्वदेशीचे सद्यस्थितीमध्ये उपायोजन करण्याचाही प्रयत्न करीत असतात. स्वदेशीच्या इतिहासात फारसे न अडकता वर्तमानकाळात त्याचे उपायोजन करण्याच्या प्रयत्नांतील मुख्यतः संकल्पनात्मक व सैद्धांतिक त्रुटी व धोके यांची चिकित्सा या टिपणामध्ये केली आहे.

## (अ) इतिहासातील स्वदेशी : मांडणीतील स्पष्टता

ब्रिटीश साम्राज्यशाहीची दोन मुख्य अंगे होती. वासाहतिक (आर्थिक) शोषण व भूमीचा (राजकीय) ताबा. भारतीय जनतेने साम्राज्यशाहीबरोबर केलेल्या संघर्षाची देखील दोन अंगे होती. आर्थिक शोषणाविरुद्धची लढाई म्हणजे स्वदेशी आणि राजकीय स्वातंत्र्यासाठीची लढाई म्हणजे स्वराज्य. साम्राज्यशाहीने आर्थिक शोषणासाठी दोन मुख्य मार्ग उपयोगात आणले होते. एक म्हणजे या देशातील विविध संसाधनांची व प्रत्यक्ष संपत्तीची लूट व फुकट किंवा कवडीमोलाने निर्यात. दुसरे म्हणजे या देशातील कारागीरांना खच्ची करून, उद्योगांची कुचंबणा करून येथील बाजारपेठेत इंग्लिश मालाची आयात व चढ्या भावाने विक्री. स्वदेशीच्या हत्याराने शोषणाच्या या दुसऱ्या मार्गावर आघात करण्याचा भारतीय जनतेचा प्रयत्न होता.

स्वदेशीच्या या स्वातंत्र्यपूर्व लढाईमध्ये एकमेकांविरूद्ध लढणाऱ्या दोन स्पष्ट बाजू होत्या. एका बाजूला सामान्य भारतीय जनता व दुसऱ्या

बाजूला ब्रिटीश शास्ते. ब्रिटीश शास्त्यांच्या बाजूने त्यांच्याशी आर्थिक व राजकीय संबंध असलेले काही भारतीय (बहुधा उच्चवर्गीय/उच्चवर्णीय) होते तर सामान्य भारतीय प्रजेच्या बाजूने साम्राज्यशाहीबरोबर जमणारे नाते तोडून (नोकऱ्या सोडून, खादी स्वीकारून) काही उच्चवर्णीय/उच्चवर्गीय भारतीय उभे राहिले होते. थोडक्यात, स्वातंत्र्यपूर्व काळातील स्वदेशीच्या संदर्भातील संकल्पनात्मक स्पष्टतेबरोबरीनेच स्वदेशीच्या लढाईतले उद्दिष्ट (ब्रिटीश मालाच्या सक्तीद्वारे होणाऱ्या आर्थिक शोषणावर आघात) आणि शत्रूही (ब्रिटीश शास्ते व त्यांचे भारतीय साथीदार) स्पष्ट होते.

## (ब) वर्तमानकाळातील स्वदेशी : वैचारिक समस्या

स्वातंत्र्यपूर्व काळातील स्वदेशीच्या मांडणीतील या विविधांगी स्पष्टतेच्या पार्श्वभूमीवर वर्तमानकाळातील स्वदेशीच्या मांडणीमधील वैचारिक धूसरता व गोंधळ प्रकर्षाने उठून दिसतो. वर्तमानकाळातील स्वदेशीच्या मांडणीमध्ये असलेल्या संकल्पनात्मक व सैद्धांतिक समस्यांमधील तीन प्रमुख समस्यांचा विचार या टिपणामध्ये केला आहे.

### (ब-१) स्वदेशीविचारातील 'भर' भिन्नता

सध्या स्वदेशीचे पाठीराखे असणाऱ्या मंडळींतील वैचारिक विविधता व त्या प्रत्येक गटाच्या स्वदेशी विचारांच्या मांडणीच्या पोटातील महत्त्वाचे भेद लक्षात घेतल्यास वर्तमान स्वदेशी विचारातील एका महत्त्वाच्या संकल्पनात्मक उणीवेचे गांभीर्य स्पष्ट होईल.

स्वदेशीच्या सध्याच्या पाठीराख्यामध्ये पुढील वैचारिक गटांचा समावेश होतो : गांधीवादी, शुद्ध पर्यावरणवादी, पर्यावरणवादाकडे झुकणारे मार्क्सवादी, पर्यायी विकासवादी, व संघपरिवार. या विविध विचारसरणीतील स्वदेशीविचारांच्या गाभ्यातील चिंता / आस्था कोणती व परिणामी स्वदेशीच्या कोणत्या पैलूंवर त्यामध्ये भर दिला जातो हे आपण पाहूया.

गांधीवादी स्वदेशीविचार हा महात्मा गांधींच्या स्वातंत्र्यपूर्व स्वदेशी विचारांचा वारसा सांगणारा (आर्थिक गाभा पण धूसर) व सद्यपरिस्थितीत सादगी, स्वावलंबन, कुटिरोद्योग यावर भर देणारा.

शुद्ध पर्यावरणवादी स्वदेशीविचारामध्ये (गाभ्यामध्ये अध्यात्मिक, सौंदर्यवादी, अथवा भूतदयावादी आस्था) पर्यावरणभक्षक आधुनिक विकासवादाचे अग्रदूत व सामर्थ्यवान समर्थक असणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांना करावयाच्या विरोधावर भर.

पर्यायी विकासवादी स्वदेशीविचारात गांधीवादातील तसेच शुद्ध पर्यावरणवादातून येणाऱ्या स्वदेशी विचाराचे एकत्रीकरण. परंतु त्याला 'समते'च्या तत्वाची ठळक जोड.

पर्यावरणवादाकडे झुकणाऱ्या मार्क्सवादातील (गाभ्याची आस्था आर्थिक) स्वदेशीविचारात भांडवलदारी व्यवस्थेतून उदयास आलेल्या व आता भांडवलदारी व्यवस्थेवर पूर्णपणे ताबा असणाऱ्या, जगभरातील पर्यावरण उदध्वस्त करणाऱ्या, गैरभांडवलदारी विकसनशील देशाच्या अर्थ व समाजव्यवस्थांवर ताबा मिळवण्यासाठी निकराचे प्रयत्न करणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांना विरोध.

संघपरिवाराची स्वदेशी सध्या जास्त प्रकाशझोतात आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे संघपरिवाराच्या स्वदेशीविचारांच्या गाभ्यातील चिंता ही आर्थिक नसून सांस्कृतिक व राजकीय आहे. सांस्कृतिक राष्ट्रवादात मूळ असलेल्या संघपरिवाराच्या स्वदेशीविचारांमध्ये बहुराष्ट्रीय कंपन्यांद्वारे या राष्ट्राच्या (महान) संस्कृतीवर होणारे आक्रमण व त्याद्वारे या राष्ट्राच्या राजकीय सार्वभौमत्वावर येणारा घाला हा तीव्र चिंतेचा विषय आहे. या आक्रमणामध्ये आज एक साधन म्हणून आर्थिक अधिसत्तेचा वापर बहुराष्ट्रीय कंपन्या करीत असल्यामुळे संघपरिवाराच्या स्वदेशीच्या लढाईला आर्थिक पैलू जोडला जातो. मूलतः संघविचारांमध्ये आर्थिक अंगावर जोर नसल्याने संघपरिवाराच्या स्वदेशीविचारात सादगी व समता यांना फारसे स्थान नसते.

संघपरिवाराच्या अंतर्गत स्वदेशीविचारांतही एकवाक्यता नाही हे देखील लक्षात घेतले पाहिजे. संघपरिवारातील स्वदेशी जागरण मंचचे प्रमुख नेते श्री गुरूमूर्ती यांच्या मांडणीमध्ये मात्र आर्थिक विचारांचे प्राबल्य आढळते. परंतु बारकाईने पाहिल्यास त्यामध्ये समाजाच्या अर्थशास्त्रीय विचारापेक्षा उद्योग, व्यापारी जगत, व भांडवल बाजार यांचे अर्थशास्त्र व औद्योगिक व्यवस्थापनशास्त्र यांचा प्रभाव जास्त आढळतो. त्यांच्या

मांडणीतील मध्यवर्ती सूत्र आहे "बिझनेस इज् वॉर" आणि या युद्धात स्वदेशी भांडवल व्यापार - उद्योग जगत् विरूद्ध परदेशी व्यापार - उद्योग - भांडवल अशा द्वंद्वाची कल्पना असते. (ती सद्य परिस्थितीत कितपत प्रस्तुत आहे हा वादाचा मुद्दा आहे.) या मांडणीत जपान व जपानी उद्योग आदर्शस्थानी मानले जातात. यामध्ये आपले विरूद्ध तुपले ठरवण्याचा मापदंड हा मात्र सांस्कृतिक असतो. समता, सादगी, स्वावलंबन या मुद्यांना या मांडणीत अर्थातच फारसे स्थान नसते.

या संकल्पनात्मक पातळीवरील भिन्नतेच्या संदर्भात अत्यंत महत्वाची गोष्ट म्हणजे या प्रत्येक विचारसरणीच्या स्वदेशीविचाराच्या गाभ्यातील पैलू/आस्था/चिंता जरी वेगवेगळे असले तरी या विचारसरणी आपल्या मांडणीत स्वदेशीच्या इतर पैलूंनाही स्थान देत असतात. म्हणजे गांधीवादी किंवा पर्यावरणीय-मार्क्सवादी मांडणीत देखील सांस्कृतिक आक्रमणाचा/प्रदूषणाचा मुद्दा असतो किंवा संघपरिवाराच्या मांडणीत आर्थिक पैलूंना बऱ्यापैकी महत्त्व दिलेले असते. परिणामी, सध्याच्या स्वदेशी समर्थकांच्या स्वदेशी विचारामध्ये मतभिन्नता आहे असे म्हणण्यापेक्षा त्यांच्या गाभ्याचे पैलू/आस्था भिन्न आहेत किंवा त्यांच्या आचारविचारांमध्ये कोणत्या पैलूवर भर/जोर द्यायचा याबाबत फरक आहे असे म्हणावे लागेल. त्यासाठी 'भरभिन्नता' हा शब्द वापरला आहे.

वर्तमानकाळातील स्वदेशी समर्थकांमधील विचारांच्या पातळीवरील हे भेद सूक्ष्म वाटले तरी त्यांच्या परिणाम कार्यक्रमाच्या/संघर्षाच्या पातळीवर झालेला दिसून येतो. पण त्याबाबतीत या टिपणात फारसे विवेचन केलेले नाही. जाता जाता नमूद करावेसे वाटते की एनरॉनविरोधी संघर्षात जिथे कार्यक्रमाच्या बाबतीत एकमत होते व जेथे स्वदेशीचा प्रश्न अगदी ऐरणीवर आला होता, तेथेदेखील एनरॉनविरोधी आघाडी न टिकण्यामध्ये या विचारातील भरभिन्नतेचा वाटा महत्वाचा होता.

थोडक्यात, वर्तमानकाळातील स्वदेशी विचाराची चिकित्सा करताना स्वदेशी समर्थकांमधील मतभिन्नता किंवा भरभिन्नता केवळ संकल्पनेच्याच नव्हे तर प्रत्यक्ष संघर्षाच्या पातळीवर देखील महत्त्वाची ठरते.

## (ब-२) स्वदेशी काय? उत्पादन की उत्पादक?

वर्तमान परिस्थितीच्या संदर्भात स्वदेशीचा अर्थ तपासून पाहता आणखी काही संकल्पनात्मक अडचणी उभ्या राहतात. स्वदेशीचा नेमका अर्थ काय? स्वदेशी कशाला / कोणाला म्हणायचं? उत्पादनाला की उत्पादकाला? दोन्ही उत्तरांत काही संकल्पनात्मक समस्या आहेत.

स्वदेशी उत्पादन कोणते? स्वदेशात तयार झालेले की स्वदेशी उद्योगाने तयार केलेले? परदेशी उत्पादकाने परदेशात तयार केलेले उत्पादन स्वदेशी मानण्याचा प्रश्नच नाही. परदेशी उत्पादकाने स्वदेशात तयार केलेले उत्पादनदेखील सहसा स्वदेशी मानले जात नाही. स्वदेशी उत्पादकाने परदेशात तयार केलेले उत्पादन स्वदेशी मानले जाईल का? हा प्रश्नच आहे. थोडक्यात, स्वदेशी उत्पादकाने स्वदेशात तयार केलेले ते स्वदेशी उत्पादन हा अर्थ सर्वमान्य ठरावा. मात्र स्वदेशी उत्पादकाने स्वदेशात तयार केलेले विशिष्ट उत्पादन हेदेखील कितपत स्वदेशी आहे ते तपासून पहावे लागेल. ही तपासणी करण्यासाठी त्या विशिष्ट उत्पादनासाठी वापरण्यात येणारी यंत्रसामुग्री, विजेसारखी इतर संसाधने, एवढेच नव्हे तर विविध प्रकारची आवरणे (उदा. टूथपेस्टसाठीची ट्यूब) यांसारख्या विविध गोष्टी/निवेश ह्या मुळात स्वदेशी उत्पादने आहेत का? त्या विशिष्ट उत्पादनासाठी दिल्या जाणाऱ्या एकूण किंमतीमध्ये किंवा या विविध निवेशांना दिल्या जाणाऱ्या किंमतीपैकी 'स्वदेशी' निवेशांना दिल्या जाणाऱ्या किंमतीचा वाटा किती आहे? इ. प्रश्नांची चिकीत्सा करावी लागेल. थोडक्यात, एखादे उत्पादन केवळ स्वदेशात तयार झाले अथवा त्यावर स्वदेशी उत्पादकाचे नाव उत्पादक म्हणून लावले गेले, म्हणून स्वदेशी ठरत नाहीत.

एखादा उत्पादक स्वदेशी आहे की नाही हे ठरवणे देखील प्रथमदर्शनी वाटते तितके सोपे नाही. उत्पादकाला/कंपनीला स्वदेशी ठरवण्याचा नेमका मापदंड कोणता? मालकाचे म्हणजे सर्वात मोठ्या भागधारकाचे जन्मस्थान की त्याचा धर्म/संस्कृती, की त्याचे नागरिकत्व की कंपनीच्या एकूण समभागांमध्ये भारतीय नागरिकत्व असलेल्या भागधारकांच्या समभागाची टक्केवारी? सद्यपरिस्थितीत एखाद्या उद्योजकाचे स्वदेशीत्व अथवा एखाद्या कंपनीचे स्वदेशीत्व यापैकी

कोणत्याही मापदंडाने ठरवणे कठीण झाले आहे. उदाहरणार्थ, आज अनेक भारतीय कंपन्या परदेशात भागांची/कर्जरोख्यांची विक्री करतात. अनेक परदेशी अथवा परदेशस्थ भारतीय उद्योजक विविध मार्गांनी भारतात निधी उभे करतात. जन्माने व कर्माने स्वदेशी असलेले अनेक उद्योजक काही कारणाने (मुख्यतः "क़रव्यवस्थापनासाठी") परदेशस्थ भारतीय बनतात.

थोडक्यात, एखाद्या उत्पादनाला अथवा उत्पादकाला स्वदेशी ठरविणे हे सद्यपरिस्थितीत कठिण आहे. एवढेच नव्हे तर एखाद्या मापदंडानुसार ठरवलेला आजचा स्वदेशी उत्पादक किंवा उत्पादन उद्या स्वदेशी राहीलच याची खात्री देता येणार नाही. तेव्हा स्वदेशी कोणाला, कशाला म्हणावे यामध्ये देखील अनेक संकल्पनात्मक अडचणी आहेत, हे लक्षात घ्यायला हवे. परिणामी, स्वदेशीचे समर्थक आज बहुराष्ट्रीय कंपन्यांवर बंदी घालण्याचा जो उपाय सुचवतात त्यामध्येही अनेक संकल्पनात्मक अडचणी आहेत हे उघड आहे.

### (ब-३) बहुराष्ट्रीय कंपन्यांना विरोध : कारणांची चिकित्सा

सध्याच्या स्वदेशी विचाराच्या मांडणीतील कळीचे सूत्र म्हणजे बहुराष्ट्रीय कंपन्यांना विरोध किंवा बंदी व स्वदेशी उद्योगांना (किंवा कुटिरोद्योगांना) संरक्षण किंवा प्रोत्साहन.

'बहुराष्ट्रीय कंपन्यांना विरोध' (त्याच्या पोटात स्वदेशी उद्योगांना प्रोत्साहन/संरक्षण) या सूत्रामधील स्वदेशीच्या संबंधातील संकल्पनात्मक पातळीवरील समस्या याआधीच्या भागात आपण पाहिल्या. आता त्या सूत्रामधील सैद्धांतिक समस्यांबाबत जरा खोलात जाऊन चिकित्सा करूया. या सूत्राचे समर्थन करण्यासाठी खालील मुख्य कारणे दिली जातात :

(अ) देशाभिमान (ब) सांस्कृतिक आक्रमण (क) देशाच्या सुरक्षेला धोका (ड) आर्थिक आक्रमण (इ) सामाजिक / पर्यावरणीय धोके. आता यातील एक एक कारणाचा विचार करूया.

#### (अ) देशाभिमान

देशाभिमानासाठी अथवा देशप्रेमापोटी स्वदेशी हा दुवा तर्काच्या कसोटीवर टिकणारा नाही. देशाचा अभिमान अथवा देशाचे प्रेम म्हणजे नक्की कसले प्रेम? अभिमानाचा नेमका मुद्दा कोणता? या देशातील भूमी,

परंपरा, लोक की चक्क उद्योग/उद्योजक? ज्यांच्या देशप्रेमाची व्याख्या भूमी, परंपरा यांच्याशी निगडीत असून या सर्वांचा अभिमान असणारा स्वदेशवासी उद्योजक (जणू 'सहोदर') ज्यांच्या प्रेमाचा/अभिमानाचा विषय आहे, त्यांनी आपले सर्वच सहोदर आपोआपच देशप्रेमी, देशहितदक्ष असतात का व त्यांचे सर्वच 'उद्योग' देशहितासाठी चाललेले असतात का? याचा शोध घ्यायला हवा. (स्वदेशी कंपन्या भारतद्रोही दहशतवाद्यांना पैसे देतात). देशवासी, देशात जन्मास आलेला, धर्म-संस्कृतीच्या नाळेने बांधला गेलेला उद्योजक स्वदेशी उद्योजक असतो असे सरसकटपणे, खात्रीने म्हणता येत नाही ह्या मुद्याचा आपण याआधी विचार केला आहेच.

ज्यांच्या व्याख्या 'देश म्हणजे या देशातील लोकसमुदाय व देशप्रेम म्हणजे लोकांच्या हिताबद्दलची कळकळ' अशा स्पष्ट व जमिनीवरच्या आहेत त्यांनी विचार करायला हवा की स्वदेशी उद्योग/उद्योजक हे मुळात या देशातील लोकांचे हित साधणारे आहेत का? या देशातील बहुसंख्य जन जर ग्राहक असतील तर ग्राहकहित हेच जनहित ठरेल व मग 'जनहित' साधण्यासाठी स्वदेशी उद्योगांना बहुराष्ट्रीय कंपन्यांची स्पर्धा असणे योग्य ठरणार नाही का? थोडक्यात, एका बाजूला उद्योग/उद्योजक ('स्वदेशी' असले तरी) व दुसऱ्या बाजूला देशातील सामान्य जन किंवा ग्राहक (या दोन वेगवेगळ्या कोटी आहेत) यांच्या हितसंबंधात रोजच्या जीवनात विरोध असतो. त्यामुळे देशप्रेमाची व्याख्या जनहितदक्षता अशी ठोसपणे करावयाची असल्यास स्वदेशी उद्योगांना संरक्षण म्हणजे जनहितरक्षण असे सरसकट समीकरण मांडता येत नाही.

### (ब) सांस्कृतिक आक्रमण

दुसरा मुद्दा सांस्कृतिक आक्रमणाचा. बहुराष्ट्रीय कंपन्या आपला माल खपवण्यासाठी तद्दन बाजारू संस्कृतीचा (ज्याला एम्.टी.व्ही. संस्कृती असेही म्हटले जाते) प्रसार करतात असा आक्षेप असतो. यामध्ये अमेरिकन/पाश्चात्य संस्कृती ती बाजारू, टाकाऊ, माणसाचा पशू करणारी आणि आमची भारतीय संस्कृती (जातीयता, अस्पृश्यता, विविध रूढी इ. असल्या तरी) तेवढी महान असा शहामृगी पवित्रा घेणाऱ्यांचा विचार करण्याची गरज नाही. परंतु बहुराष्ट्रीय कंपन्यांनी सुरू केलेल्या सर्वच संस्कृतीच्या व्यापारीकरणाच्या प्रक्रियेवर जे नेमकेपणाने बोट

ठेवतात अशांच्या सूज्ञ आक्षेपांचा गांभीर्याने विचार करायला हवा. या संदर्भात ह्या आक्षेपकर्त्यांनी ध्यानात घ्यायला हवे की संस्कृतीच्या व्यापारीकरणाची प्रक्रिया केवळ बहुराष्ट्रीय कंपन्यांना बंदी घालून थांबवता येणार नाही. अमेरिका नावाचे स्वप्न जे पूर्वी काही उच्चमध्यमवर्गीयांपुरते मर्यादित होते ते स्वप्न आताच्या माहितीच्या युगात मोठ्या जनसमूहापर्यंत पोचणे अपरिहार्य होते. ते स्वप्न विकून त्याबरोबरीने आपले उत्पादन विकण्याच्या मोहाला बहुराष्ट्रीय कंपन्या बळी पडतात, मात्र हा मोह स्वदेशी उद्योजक व्यापक जनहित लक्षात घेऊन टाळतील / टाळतात असे म्हणणे धारिष्ट्याचे ठरेल. आपल्या स्वदेशी सरकारने अर्थव्यवस्थेचे / विकासाचे जे नवे "मुक्त बाजारपेठी" प्रतिमान स्वीकारले आहे (व ज्याला आपल्या बहुसंख्य समाजधुरिणांचा / समाजाच्या मुख्यप्रवाहाचा पाठिंबा आहे) त्याचा (एक) अनिवार्य परिणाम म्हणजे संस्कृतीचे व्यापारीकरण. ह्या संस्कृतीच्या व्यापारीकरणाचा उद्योगांच्या स्वदेशीत्वाशी अथवा बहुराष्ट्रीयत्वाशी फारसा संबंध नाही. या व्यापारीकरणाबरोबरच जी अश्लीलता, लैंगिकता यांसारख्या विकृती येतात त्यांचाही मुळात उद्योगांच्या स्वदेशीत्वाशी फारसा संबंध नाही. या विकृतींना योग्य नियम व यंत्रणाद्वारे पायबंद घालता येईल. त्यासाठी बहुराष्ट्रीय कंपन्यांवर बंदी घालण्याची गरज नाही आणि त्याचा उपयोगही नाही.

थोडक्यात, सांस्कृतिक आक्रमण किंवा योग्य शब्दात सांगायचे तर संस्कृतीचे व्यापारीकरण हे समाजाच्या स्वदेशी धुरीणांनी स्वीकारलेल्या बाजारपेठी अर्थव्यवस्थेच्या प्रतिमानाचा व माहितीच्या तंत्रज्ञानातील क्रांतीचा परिपाक आहे. त्याचा उद्योगांच्या मालकीशी फारसा संबंध नाही. तसेच ह्या व्यापारीकरणामुळे ज्या विकृती निर्माण होतील त्यांचा प्रतिकार कडक नियम व सक्षम यंत्रणा यासारख्या उपायांनी किंवा सामाजिक/सांस्कृतिक जागृती आणि निषेध व दबाव यांसारख्या मार्गांनीच करावा लागेल ते काम बहुराष्ट्रीय कंपन्यांवर बंदी घालून होणार नाही.

(क) राष्ट्रीय सुरक्षा किंवा राजकीय आक्रमण

बहुराष्ट्रीय कंपन्यांना असलेल्या विरोधातील तिसरा मुद्दा राष्ट्रीय सुरक्षिततेचा किंवा छुप्या राजकीय आक्रमणाचा. यामागील मुख्य तर्कवाद

असा : बहुराष्ट्रीय कंपन्यांना जर मुक्त प्रवेश दिला तर त्या आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेवर ताबा मिळवतील व हळुहळू या देशातील राजकारणावर/प्रशासनावर प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष ताबा मिळवून देशाच्या सार्वभौमत्वालाच त्या धोका निर्माण करतील.

बहुराष्ट्रीय कंपन्यांना व्यापारी कामकाज करायला देताना त्यांच्यावर या देशातील कायद्यांच्या/धोरणाच्या चौकटीत राहूनच उद्योग व व्यापार करण्याचे बंधन असते. ही मर्यादा ओलांडून त्या देशाचा ताबा घेणार नाहीत ही दक्षता घेण्याची जबाबदारी देशातील विविध प्रशासनिक, न्यायालयीन, व राजकीय यंत्रणांची आणि व्यवस्थांची आहे. एवढेच नव्हे तर लोकशाही देशात जागरूक सामाजिक संस्थांनी देखील या कामात भाग घेतला पाहिजे. या यंत्रणा व समाजातील संस्थात्मक जीवन मजबूत करणे व जनतेने जागृत राहून स्वहिताचे रक्षण करणे हा या धोक्यावरचा उपाय आहे. हे न करता केवळ बहुराष्ट्रीय उद्योगांवर बंदी घातली तर स्वदेशी उद्योग, ह्या विविध यंत्रणा व व्यवस्था यामधील उणिवांचा फायदा घेऊन स्वतःचा स्वार्थ (प्रसंगी बहुराष्ट्रीय कंपन्यांना मदतीला घेऊन) साधण्याऐवजी जनहिताचे रक्षण करतील असे मानणे आजच्या परिस्थितीत तरी प्रस्तुत ठरणार नाही.

### (ड) आर्थिक आक्रमण

आता चौथ्या, आर्थिक आक्रमणाच्या मुद्याकडे वळू या. या अंतर्गत बहुराष्ट्रीय कंपन्यांविरुद्ध घेतल्या जाणाऱ्या दोन मुख्य आक्षेपांचा (किंवा वर्तवल्या जाणाऱ्या धोक्यांचा) विचार प्रामुख्याने करायला हवा.

बहुराष्ट्रीय कंपन्यांविरूद्धचा पहिला महत्त्वाचा आर्थिक आक्षेप आहे आर्थिक शोषणाचा. थोडक्यात सांगायचे तर बहुराष्ट्रीय कंपन्या नफ्याची पाठवणी परदेशी करतात व त्यातून या देशातील संपत्तीचे हरण व अर्थव्यवस्थेचे शोषण होते असा आक्षेप असतो. यासंदर्भात लक्षात घेतले पाहिजे की आपल्या समाजधुरिणांनी अर्थव्यवस्थेचे/विकासाचे जे नवीन प्रतिमान स्वीकारले आहे त्यासाठी मोठ्या प्रमाणावर भांडवल व अत्याधुनिक तंत्रज्ञानाची गरज आहे. आता हे भांडवल व अत्याधुनिक तंत्रज्ञान ज्या बहुराष्ट्रीय कंपन्या आणतील त्यांनी त्यांचा 'योग्य' तो मोबदला नफ्याच्या रूपाने घेणे गैर ठरवता येणार नाही. आता हा

मोबदला 'योग्य' असावा, 'अवास्तव' नसावा हा महत्वाचा भाग आहे. नफ्यासाठी काम करणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपन्या, सर्व वैध (प्रसंगी अवैध) मार्गांनी 'अवास्तव' नफा मिळवण्याचा प्रयत्न करणार हे उघडच आहे. या बाबतीत बहुराष्ट्रीय कंपन्या स्वदेशी कंपन्यांच्या तोडीस तोड ठरतील हे आपण गृहित धरले पाहिजे. तेव्हा दोन्ही प्रकारच्या कंपन्या कायदे, धोरणांच्या चौकटीत राहूनच नफा कमवतील यावर लक्ष ठेवण्यासाठी सक्षम आर्थिक नियमन यंत्रणा असणे आवश्यक आहे. त्याहीपेक्षा मुळात नव्या परिस्थितीला सुयोग्य ठरणारी धोरणे व कायदेविषयक चौकट निर्माण करणेही गरजेचे आहे. तेव्हा बहुराष्ट्रीय (तसेच स्वदेशी) कंपन्यांच्या अवास्तव नफेबाजी बद्दल भीती असेल तर त्यावरचे उपाय वेगळे आहेत हे लक्षात घेतले पाहिजे.

दुसरा आर्थिक आक्षेप म्हणजे बहुराष्ट्रीय कंपन्या त्यांच्या आर्थिक व राजकीय शक्तीच्या बळावर आपल्या बाजारपेठेचा ताबा घेतील. बाजारपेठेचा ताबा म्हणजे अर्थव्यवस्थेचा ताबा. त्यातून एक तर देशाचे आर्थिक शोषण व दुसरे म्हणजे अर्थव्यवस्थेवरील ताब्यामुळे देशाच्या सार्वभौमत्वाला निर्माण होणारा धोका अशी तर्कवादाची साखळी रचली जाते. आर्थिक शोषणाचा मुख्य वैध मार्ग म्हणजे 'अवास्तव' नफ्याची परदेशी पाठवणी करण्याचा. आधीच्या परिच्छेदात आपण त्याचा विचार केला आहेच. त्याचप्रमाणे राजकीय व सार्वभौमत्वाच्या धोक्याचाही विचार आपण याआधी केला आहेच. त्यामुळे त्या मुद्यांची उजळणी परत येथे केलेली नाही.

(इ) सामाजिक व पर्यावरणीय धोके

शेवटचा मुद्दा आहे सामाजिक व पर्यावरणीय धोक्यांचा. बहुराष्ट्रीय कंपन्यांना या देशाशी काहीही बांधिलकी नसल्याने आपला फायदा करून घेण्यासाठी त्या इथल्या विविध समाजगटांच्या हिताचा किंवा पर्यावरणाचा बळी देण्यास मागेपुढे पाहणार नाहीत असे या आक्षेपकर्त्यांचे म्हणणे असते. अर्थात स्वदेशी कंपन्यांचा या बाबतीतला इतिहास फारसा वेगळा आहे असे नाही. एवढेच नव्हे तर सरकारी यंत्रणांकडून झालेल्या (विस्थापनादी) सामाजिक व पर्यावरणीय हानीसंबंधातील इतिहासही तेवढाच भीषण आहे. तेव्हा अशा प्रकारच्या

धोक्यांपासून समाजाला (विशेषतः पददलित गटांना) व पर्यावरणाला वाचवायचे असेल तर केवळ बहुराष्ट्रीय कंपन्याच नव्हेत तर स्वदेशी उद्योग व सरकारी यंत्रणा या सर्वांवरच अंकुश ठेवावा लागेल. त्यासाठीदेखील जनहितदक्ष व कार्यक्षम अशा यंत्रणा व व्यवस्था उभ्या करणे गरजेचे ठरेल.

(ई) बंदीच्या उपायातील वैय्यर्थ

असा प्रकारे बहुराष्ट्रीय कंपन्यांविरूद्ध घेतल्या जाणाऱ्या विविध आक्षेपांच्या व त्यांच्याकडून निर्माण होणाऱ्या कथित धोक्यांच्या विवेचनातून स्पष्ट होते की, स्वदेशीचे समर्थक मांडतात तो बहुराष्ट्रीय कंपन्यांवर बंदी घालण्याचा टोकाचा उपाय ह्या आक्षेपांच्या निवारणासाठी अत्यावश्यक नाही. एवढेच नव्हे तर त्यासाठी इतरही सौम्य पण जास्त परिणामकारक उपाय उपलब्ध आहेत. त्याचबरोबर हे देखील लक्षात घ्यायला हवे की स्वदेशीसमर्थकांनी बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या बाबतीत घेतलेले आक्षेप व दाखवलेले धोके "स्वदेशी" उद्योगांनाही लागू पडतात. तेव्हा बहुराष्ट्रीय कंपन्यांवर बंदी घातल्यास बहुराष्ट्रीय कंपन्यांकडून होणारे धोके कदाचित टळतील. मात्र त्यामुळे स्वदेशी उद्योग (व प्रसंगी त्यांच्या आडून बहुराष्ट्रीय कंपन्या) तेच धोके निर्माण करणार नाहीत याची हमी देता येणार नाही. त्यामुळे अंतिमतः बहुराष्ट्रीय कंपन्यावरील बंदीचा उपयोग परिणामकारक ठरत नाही. त्याशिवाय या टिपणाच्या आधीच्या भागात म्हटल्याप्रमाणे स्वदेशीचा विचार अंमलात आणण्यामध्ये अनेक संकल्पनात्मक व प्रत्यक्षातील अडचणी आहेतच. याउलट विवेचनात वेळोवेळी सुचवलेला सुयोग्य, कडक कायदे, जनहितदक्ष व सक्षम यंत्रणा, व जागरुक सामाजिक संस्थाद्वारा नियमनाचा उपाय मात्र स्वदेशी तसेच बहुराष्ट्रीय अश्या दोन्ही प्रकारच्या कंपन्यापासून समाजाचे, देशाचे, अर्थव्यवस्थेचे, व संस्कृतीचे, व पर्यावरणाचे संरक्षण करु शकेल असे दिसते. ह्या उपायाला येथे लोकांचे खरेखुरे स्वराज्य असे म्हटले आहे. ह्या उपायाचे विस्ताराने विवेचन नंतरच्या (क) ह्या भागात केले आहे.

## (ब-४) स्वदेशी व नवी अर्थनीती : एक टीप

आपल्या समाजधुरिणांनी स्वीकारलेल्या नव्या अर्थव्यवस्थेच्या व विकासाच्या प्रतिमानात बहुराष्ट्रीय कंपन्यांची महत्त्वाची भूमिका असणार

हे या संदर्भात ध्यानात घ्यायला हवे. नव्या अर्थनीतीमध्ये व नव्या विकासाच्या प्रतिमानात महत्वाचे स्थान असणाऱ्या मोठ्या प्रमाणातील भांडवल व उच्च, अतिउच्च तंत्रज्ञान या विशिष्ट गरजा भागवण्यासाठी बहुराष्ट्रीय कंपन्यांशिवाय आज तरी पर्याय दिसत नाही. तेव्हा ज्यांचा नव्या अर्थनीतीला स्वदेशीच्या मुद्याव्यतिरिक्त इतर मुद्यांवरून विरोध नाही त्यांनी नवी अर्थनीती व बहुराष्ट्रीय कंपन्यांमधील हा जवळचा संबंध ध्यानात घेतला पाहिजे. या पार्श्वभूमीवर त्यांच्या विचारात दिसणाऱ्या विसंगतीचा पुनर्विचार केला पाहिजे.

अर्थात ज्या मंडळींना अर्थव्यवस्थेचे/विकासाचे नवे प्रतिमानच मुळात मान्य नाही व जे त्याऐवजी पर्यायी प्रतिमानाची मांडणी व त्यासाठी संघर्ष करीत आहेत त्यांच्या दृष्टीने बहुराष्ट्रीय कंपन्यांना भांडवलाची व अत्याधुनिक तंत्रज्ञानाची आपल्या देशाला फारशी गरज नाही. उलट या पर्यायी विकासवाद्यांच्या मते बहुराष्ट्रीय कंपन्यांमुळे विस्थापनादी सामाजिक समस्या व पर्यावरणीय विध्वंस अशांसारखे धोके अधिकच तीव्र होतात. त्यामुळे त्यांचा बहुराष्ट्रीय कंपन्यांना असलेला टोकाचा विरोधदेखील तर्कसंगत ठरतो.

## (क) जनतेचे खरेखुरे स्वराज्य

आधीच्या भागात उल्लेखलेला जनतेच्या खऱ्याखुऱ्या स्वराज्याचा उपाय समजून घ्यायला हवा. त्यातील पहिले सूत्र आहे - कार्यक्षम कामकाज यंत्रणा म्हणजे कायद्याने व सार्वजनिक धोरणाने आखून दिलेल्या चौकटीत राहून आपली कर्तव्ये चोखपणे पार पाडणाऱ्या प्रशासनिक व न्यायालयीन यंत्रणा. दुसरे सूत्र आहे - जनहितदक्ष व सक्षम नियामक व्यवस्थांचे. केवळ प्रशासनच नव्हे तर खाजगी व सरकारी उद्योग व समाजातील इतर गट आपापले उद्योग व कामकाज कायद्याच्या व धोरणात्मक चौकटीत राहून करतील याची दक्षता घेणारी व्यवस्था म्हणजे नियामक (रेग्युलेटरी) व्यवस्था. सरकारी नियमनाचे चटके सोसलेल्या ह्या देशात हे नियमन खऱ्या अर्थाने स्वायत्त असलेल्या नियामक संस्थाद्वारा व्हावे हे सूत्र सर्वमान्य होण्यास हरकत नाही. या नियामक संस्थांच्या कारभारात पारदर्शित्व, जनतेला सहभागाची संधी, व जनतेप्रती उत्तरदायित्व (अकौंटेबिलिटी) असणे जनहितरक्षणाच्या दृष्टीने

आवश्यक आहे. तिसरे सूत्र सक्षम व जागृत सामाजिक संस्थांच्या जाळ्याचे. एका बाजूने नियामक व्यवस्थेतील संधीचा वापर करून कामकाज यंत्रणांवर नियंत्रण ठेवणे व दुसऱ्या बाजूने जागृत लोकमताच्या दट्ट्याखाली राजकीय व्यवस्थेवर अंकुश ठेवणे तसेच व्यापक जनहितास अनुकुल अशी धोरणे आखण्यास राजकीय व्यवस्थेला भाग पाडणे असे तिहेरी काम सक्षम व जागृत अशा सामाजिक संस्थांच्याद्वारे जनता साधू शकेल. या त्रिसूत्रीद्वारे जनतेचे खरेखुरे 'स्वराज्य' उभे करता येऊ शकेल.

मात्र स्वराज्याचा उपाय हा स्वदेशीच्या उपायापेक्षा जास्त प्रभावशाली आहे हा सैद्धांतिक निष्कर्ष काढताना प्रत्यक्षातील एक धोका लक्षात घ्यायला हवा. आजच्या परिस्थितीत स्वदेशीचा उपाय पुरेसा व परिणामकारक ठरणार नाही. हे आपण याआधी पाहिले आहेच. एवढेच नव्हे तर दुसऱ्या बाजूने एकदा स्वराज्याचा उपाय परिणामकारकरीत्या अंमलात आणल्यास स्वदेशीच्या उपायाची गरज राहणार नाही हे देखील खरे आहे. मात्र स्वराज्याचा उपाय पूर्णपणे अंमलात येण्याआधी म्हणजे कार्यक्षम कामकाज यंत्रणा, जनहितदक्ष व सक्षम नियामक व्यवस्था व जागृत सामाजिक संस्था प्रत्यक्ष अस्तित्वात येण्याआधीच्या काळात काय करावे हा महत्वाचा प्रश्न आहे.

या मधल्या काळात देशात असलेल्या स्वदेशी उद्योगांवर व सरकारी यंत्रणांवर अंकुश ठेवण्यामध्ये अनेक अडचणी आहेतच. अशा परिस्थितीत पैसा व इतर बाबतीत स्वदेशी उद्योगांच्या कित्येक पटीने बलवान असणाऱ्या व या देशातील कायद्याची फारशी भीती न बाळगणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांना या देशात मुक्त प्रवेश दिल्यास जनहितास फार मोठा धोका होऊ शकतो. बहुराष्ट्रीय कंपन्यांचा जगभरातील अनुभव खुल्या मनाने पाहिल्यास हा धोका नक्कीच जाणवेल. तेव्हा या काळात बहुराष्ट्रीय कंपन्यांवर विविध प्रकारची व कडक बंधने घालण्याचा उपाय अमलात आणणे जनहितरक्षणाच्या दृष्टीने आवश्यक ठरेल.

अशी बंधने आणल्यास परदेशी गुंतवणुकीचा ओघ आटून आपल्या देशाचे मोठे नुकसान होईल असे म्हटले जाते. अर्थात ह्या मुद्द्याचे विविध तऱ्हेने खंडन केले गेले आहे पण ह्या टिपणाच्या मर्यादित अवकाशात त्या वादाला जागा देता येणार नाही.

बहुराष्ट्रीय कंपन्यांवर अशी बंधने आणण्यात आणखी एक मोठा धोका आहे. मर्यादित स्वदेशीचा हा उपाय लागू केल्यावर जनतेचे खरेखुरे स्वराज्य आणण्याच्या प्रयत्नांकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता मोठी आहे, असे न करता चिकाटीने स्वराज्याचा उपाय अंमलात आणण्यासाठी प्रयत्न करीत राहणे महत्वाचे ठरेल. मर्यादित स्वदेशीचा हा उपाय लागू करणे तसे सोपे आहे. पण जनतेचे खरेखुरे स्वराज्य प्रत्यक्षात आणण्याचे काम अतिशय कठीण आहे. समाजातील विविध घटकांमध्ये जागृती घडवून विविध अर्थाने दुर्बल असणाऱ्या समाज घटकामध्ये नव्या क्षमता निर्माण करुन, नवीन संस्थात्मक संरचना, कायदे, धोरणे ह्यांचा अवलंब करुन हे स्वराज्य आपणास उभे करावे लागेल व हेच आज आपल्या समोरील एक मोठे व महत्वाचे आव्हान आहे.

■■■

# 'स्वदेशी' संबंधित अर्थशास्त्रीय संकल्पनांचे विवेचन

श्री. राजीव साने

*[ "स्वदेशी" चे समर्थक जे अनेक तर्कवाद मांडतात व त्यावर आधारित दावे करतात त्यामध्ये अनेक अर्थशास्त्रीय घोटाळे असतात असे स्वदेशीच्या टीकाकारांचे म्हणणे असते. ह्या पार्श्वभूमीवर स्वदेशीशी संबंधित विविध अर्थशास्त्रीय संकल्पना व सिद्धांत नीट समजून घेणे गरजेचे आहे. श्री. राजीव साने ह्यांच्या क्रिस्त्रीम (१९९८ दिवाळी अंक) मधील "ज्वलंत स्वदेशी - साधक आणि बाधक" ह्या लेखामध्ये विविध अर्थशास्त्रीय संकल्पना सोप्या भाषेत व लक्षवेधी उदाहरणाद्वारे समजावून सांगण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातील काही भाग संकलित करून अर्थबोध पत्रिकेच्या वाचकांसाठी सादर करीत आहोत. ]*

**"पैसा बाहेर जाणे" आणि निर्यात**

"काय हो ! तुमच्या या केन्ससाहेबाला जर्मनांचा एवढा पुळका कशाला आलाय?"

"छे हो ! पुळकाबिळका काही नाही. ते आपल्या फायद्याचा विचार करून बोलताहेत."

"फायदा? अहो, या जर्मनांवर चांगले दाबून दंड बसवले पाहिजेत. त्यांना शिक्षा तर झालीच पाहिजे. पण युद्धामुळे आपलं एवढं नुकसान झालं ते भरून नको निघायला? हा केन्स तर म्हणतो दंड बेताने बसवा !"

"समजा, आपण प्रचंड दंड बसवले आणि जर्मनांनी त्यांच्या डॉईश मार्कच्या साध्या नोटा नुसत्या छापून पाठवून दिल्या तर आपल्याला मिळणार काय? नुसते कागद!"

"असं कसं? आपण त्या नोटांच्या बदल्यात मालही वसूल करूच की !"

"म्हणजेच पैसे वसूल करायचे तर जर्मन मालही घ्यावाच लागेल."

"मग? घेऊ की !"

"या मालाच्या किंमती किती द्यायच्या? त्या मालाला जर्मनीत जे भाव मिळतात त्या भावांनी?"

"काही तरीच काय! जे भाव त्यांना एवीतेवी मिळतातच तेच भाव आपण द्यायचे? मग दंड वसूल होणारच कसा?"

"अगदी बरोबर ! जर दंड वसूल करायचा असेल तर जर्मन मालाला जर्मनीत ज्या किंमती मिळतात त्यापेक्षा कितीतरी कमी किंमतीलाच त्यांना माल द्यायला लावला पाहिजे."

"लावलाच पाहिजे ! आता त्यांना झकत कमी किंमती मान्य कराव्याच लागतील. तह करायचा म्हणजे तशा अटी घालायच्याच."

"समजा घातल्या आणि अगदी मातीमोल भावांनी जर्मन वस्तू आणल्या, तर जेव्हा त्या वस्तू आपल्या बाजारात येतील तेव्हा आपल्या वस्तूंच्या मागणीचं काय होईल?"

"खरंच की ! हा विचार मी केलाच नव्हता. म्हणजे हा जर्मन पैसा आपण मिळवला तर आपल्या मागणीचा ओघ त्यांच्याकडे वळल्यासारखा होईल."

"नेमकं हेच केन्ससाहेब म्हणतायत, आणि फक्त आपल्याला मंदी येईल एवढंच नाही, दंड देऊन शिवाय उद्योग तगवायचे तर जर्मनांना त्यांची उत्पादकता वाढवावीच लागेल. ती कायमची वाढून बसेल... आणि दंडाचा पैसा मिळाल्यावर आपण मात्र आळशी आणि ऐतखाऊ होऊन बसू."

"म्हणजे पैसा ही विचित्रच गोष्ट आहे म्हणा की! घ्यावा तरी पंचाईत आणि न घ्यावा तरी पंचाईत!"

"पैसा हे फक्त माध्यम आहे. प्रत्यक्ष वस्तूंच्या उत्पादनात कसे फरक पडतील, त्याचे पुढे जाऊन काय परिणाम होतील, याचा विचार करावा लागतो."

"आलात का मूळपदावर ! तुम्ही अर्थशास्त्राचे विद्यार्थी. तुम्हाला तुमचं महत्त्व वाढवायला हवं नाही का?"

"आणि तुम्ही राष्ट्रवादी कार्यकर्ते ! तुमचं महत्त्व..."

"जाऊ दे राव. नेहमीचं भांडण कशाला उकरा..."

वरील संवाद जरी रचित असला तरी तो वास्तवाला सोडून नाही. केन्स यांचे 'इकॉनॉमिक कॉन्सिक्वेन्सेस ऑफ पीस' यासारखे निबंध पाहिले किंवा आंतरराष्ट्रीय व्यापारावरील युद्धकालीन मंथन लक्षात घेतले, तर असे संवाद उदाहरणार्थ फ्रान्समध्ये झडले असतील याची कल्पना करता येते. कोणत्याही आर्थिक व्यवहाराला, 'पैशाचे हस्तांतर' या दृश्य स्वरूपामागे लपलेली दुसरी बाजू असते याची सतत जाणीव राहावी यासाठी वरील संवाद दिला आहे.

स्वदेशीवादाचे जे जनमानसात रूढ झालेले स्वरूप आहे त्यात हमखास 'भारताचा पैसा भारताबाहेर जातो' ही काहीतरी भयंकर घटना आहे असे मानलेले दिसते. इतर जगाने भारताकडून पैसा मिळवला (मग तो कोणत्याही चलनात येन, डॉलर, पौंड वगैरे असो) पण भारताकडून काहीच आयात केले नाही. तर हा पैसा वसूलच होत नाही. नुसता पैसा मिळवला व त्या पोटी वस्तू/सेवा घेतल्याच नाहीत तर ते परदेशी लोक फक्त आपली 'महागाई' आयात करतील ! जेव्हा 'ते' वस्तू/सेवा आयात करतात तेव्हा 'आपण' त्या निर्यात करतोच. पैसा बाहेर जाण्यामुळे निर्यातीची संधी उपलब्ध होऊ शकते. आता ही निर्यात अन्यायकारक किंमतीला होते किंवा कसे हा भाग निराळा. पण पैसा 'बाहेर' जाणे हेच खुद्द वाईट, असे मानता येत नाही, किंबहुना पैशाचा उपयोग हा तो बाळगण्यात नसून चालवण्यात असतो. चालते ते चलन. पण स्वदेशीवादाचे धोपटमार्गी स्वरूप म्हणजे पैसा बाहेर जाऊ न देणे एवढेच! इतके की काही मंडळींनी 'पैसा अडवा पैसा जिरवा' अशी घोषणासुद्धा दिली आहे !

## चलनाचा विनिमय दर

भारताचा पैसा भारताबाहेर जातो याविषयी जसा एक धसका घेतला जातो तसाच धसका 'रुपया घसरला' या बातमीचाही घेतला जातो. अवमूल्यन या शब्दामुळे देशाचे काहीतरी वाईटच झाले आहे असे सहजच वाटते. परंतु एखाद्या देशाचे नाणे महाग असले की त्याची अर्थव्यवस्था भक्कम असतेच असे काही नाही. असे सुटसुटीत, एकास एक प्रकारचे अन्वयार्थ लावणे बरोबर नाही.

नेमक्या कोणत्या वस्तू/सेवांची आयात वा निर्यात होणे देशाला फायदेशीर आहे? त्या आयात निर्यातीला उत्तेजन मिळते का? याचा विचार करावा लागतो. प्रत्यक्ष वस्तुव्यापाराचे योग्य प्रतिनिधित्व

करण्यासाठी, विविध देशाची चलने लवचिकपणे मिळते जुळते घेणारी असावी लागतात. बराच काळ आपला चलनदर आडमुठेपणाने घट्ट धरून ठेवणे व अगदीच पंचाईत झाल्यावर अचानकपणे मोठ्ठी घसरण पत्करणे, यापेक्षा धीम्या गतीने व वास्तववादी प्रमाणात अवमूल्यन होणे हे जास्त हिताचे ठरू शकते.

जर आपले धोरण तथाकथित स्वावलंबनवादी असलेच तर आयात कमीत कमी ठेवावी असे ठरवावे लागते. रुपया 'घसरला' तर आयात महाग होऊन बसेल व आयात टाळली जाईल. ही तर (उथळ) स्वदेशीवादाच्या दृष्टीने आनंदाचीच बातमी म्हणावी लागेल ! 'आपण अण्वस्त्र चाचणी केली, त्यामुळे आता निर्बंध बसतील व स्वदेशीला प्रोत्साहनच मिळेल' असा आनंद मानणारे लोक हे रुपया 'घसरला' म्हणून दुःखी का होतात हेच समजत नाही. जे आयातदार असतील ते दुःखी होणे आपण समजू शकतो.

दुसऱ्या बाजूने, रुपया घसरल्याने निर्यातदारांना एकतर पूर्वीपेक्षा जास्त किंमती तरी मिळतील, किंवा किंमती त्याच ठेवून जास्त मोठी बाजारपेठ तरी मिळेल. कारण भारतीय माल हा आता इतर देशांच्या तूलनेने जास्त स्पर्धायोग्य (कॉंपिटिटिव्ह) बनलेला असेल.

म्हणजेच प्रत्येक गोष्टीला एक दुसरी बाजूही असते व तिचाही विचार करावाच लागतो. उलटसुलट परिणामांची इष्टतम (ऑप्टिमम) गोळाबेरीज काय हा खरा प्रश्न असतो. यावर कोणी म्हणेल की आपण फक्त निर्यातच करूया, आयात करूयाच नको. हे म्हणणे म्हणजे, रस्ते फक्त उताराचेच बांधू म्हणजे पेट्रोल लागणार नाही. असे म्हणण्यासारखे आहे. कोणताही 'उतार' हा त्याचवेळी दुसऱ्या बाजूने 'चढ' ही असतोच. निर्यात ही जर फुकटात करायची नसेल तर, निर्यातीतून मिळालेल्या पैशाइतकी आयातही करावीच लागते.

खरे तर, रुपया स्वस्त होणे ही गोष्ट आंतरराष्ट्रीय पातळीवर घडल्यासारखी दिसते; पण प्रत्यक्षात आपण ते काम देशांतर्गत पातळीवरच करत असतो. आपण सरकारी नोकरांच्या पगारात चाळीस टक्के व तीही पूर्णपणे महागाईपासून संरक्षित (फुलली न्यूट्रलायझिंग डी. ए. स्कीम) करतो. आपण 'हे फुकट' 'ते फुकट' अशा 'फुकटकल्याणी'

निराधार योजना राबवतो. म्हणजेच थोडक्यात वित्तीय तुटीचे अर्थकारण करतो. यातून आपण रुपयाची अंतर्गत किमत कमी कमी करत नेतच असतो. सार्वत्रिक भाववाढ (इनफ्लेशन) झाली की आपली निर्यातदेखील (श्रम स्वस्त असूनही) महागते व आंतरराष्ट्रीय बाजारात स्पर्धायोग्य रहात नाही. निर्यात घटत जाते व आयातीला आवश्यक इतके परकीय चलन मिळेनासे होते. अशा परिस्थितीत चलनदर बदलून पुन्हा निर्यात स्पर्धायोग्य बनवावी लागते. म्हणजेच रुपयाचे अवमूल्यन हे खरे म्हणजे देशांतर्गत भाववाढीनेच होत असते. ते आंतरराष्ट्रीय पातळीवर कबूल करण्याचाच तेवढा प्रश्न असतो. मात्र गंमत अशी की जो अर्थमंत्री हे प्रांजळपणे कबूल करतो तो 'देशबुडव्या' ठरतो. मात्र ज्यांनी तूट वाढवून रुपयाची किंमत पाडलेली असते ते 'लोककल्याणकारी' ठरतात.

**परकीय कर्ज विरुद्ध परकीय गुंतवणूक**

निरनिराळ्या प्रकारचे स्वदेशीवाद किंवा निरनिराळ्या प्रकारचे जागतिकीकरणविरोध हे एक मोठ्ठा वैचारिक घोटाळा करीत आहेत. हा घोटाळा निस्तरला नाही तर कोणत्याच बाजूचे म्हणणे पुढे जाणार नाही. आपण कोणतेही 'वादी' असू पण आपापल्या 'वादा'ला नेमकेपणा व नेटकेपणा आणणे (व त्यातील नाटकीपणा कमी करणे !) हे आपले कर्तव्य ठरते. याकरिता आपण नेमके कशाविषयी बोलत आहोत हे अगदी स्पष्ट असले पाहिजे. परकीय कर्ज (फॉरिन डेट) व परकीय गुंतवणूक (फॉरिन इनव्हेस्टमेंट) या दोन अगदी भिन्न गोष्टी असूनही आपण "शेवटी परकीय ते परकीयच मग कर्ज म्हणा नाहीतर गुंतवणूक म्हणा." अशी सरधोपट वृत्ती बाळगून प्रश्नांकडे बघतो.

परकीय कर्ज हे स्वकीयांनी केलेले कर्ज असते. ते फेडण्याची जबाबदारी स्वकीयांच्या शिरावर असते. परंतु परकीय गुंतवणुकीत जबाबदारी 'त्यांची' व उत्पादनसाधनांची उभारणी मात्र 'आपल्या' देशात अशी परिस्थिती असते. हे नीट कळावे म्हणून आपण एक उदाहरण घेऊ.

सोमाजीपंत आणि गोमाजीपंत या नावाचे दोन वृद्ध गृहस्थ आहेत. दोघांचीही स्थिती हलाखीची आहे. दोघांच्याहीकडे मालकीचे राहते घर आहे व या घरात थोडी मोकळी जागाही आहे. दोघांनाही एकेक बेकार मुलगा आहे. या स्थितीतून वर येण्यासाठी दोघांनी दोन वेगळे मार्ग अवलंबिले.

सोमाजीपंतांनी एका व्यापाऱ्याकडून कर्ज घेतले व या कर्जातून त्यांनी आपल्या मुलाला घरातल्या मोकळ्या जागेत एक दुकान काढून दिले. दुकानात मालही कर्जातूनच भरला. पण दुकान चालवणे ही काही सोपी गोष्ट नाही. त्यात कष्ट आहेत. चिकाटी, हातोटी, सचोटी, चोखपणा, नियोजन, ग्राहकांना आपलेसे करून घेण्याची नम्रता वगैरे अनेक गुण शिकावे लागतात. मुलाला काही हे जमले नाही. दुकान तोट्यात चालत राहिले. कर्ज वाढत राहिले. उत्पन्न तर काहीच नाही. होता होता घर विकायची पाळी आली.

गोमाजीपंतांनी वेगळाच मार्ग स्वीकारला. त्यांनी त्या व्यापाऱ्यालाच दुकान काढण्यासाठी जागा भाड्याने दिली. मात्र अट अशी घातली की मुलाला दुकानात नोकरीवर घेतलेच पाहिजे. मुलालाही बजावले की तू घरात मालक असशील पण दुकानात नोकर आहेस. तिथे शेटजी सांगतील तसं व तितकं काम करावंच लागेल. मुलगाही दुकानदाराच्या हाताखाली 'तयार' झाला. भाडे व मुलाचा पगार घरात येऊ लागला. बचत झाली आता मुलगा दुकानात भागीदारी मागण्याच्या स्थितीत आला.

सुरुवातीला सोमाजीपंत 'स्वाभिमानी' ठरले. घरात परक्याला पाऊल ठेवू दिलं नाही म्हणून नातेवाईकांनी मारे स्तुती केली. पण कर्ज वाढल्यावर फेडायला कोणी फिरकलं नाही. उलट गोमाजीपंतांना सुरुवातीला मूर्खात काढलं गेलं. एकदा हा दुकानदार घरात शिरला की सगळंच बळकावून बसेल अशी भीतिही व्यक्त केली गेली.

या उदाहरणात सोमाजीपंतांनी जे केले ते 'परकीय कर्ज' होते. उलट गोमाजीपंतांनी जिला परवानगी दिली ती परकीय गुंतवणूक होती. म्हणजेच दुकान चालले नसते तर तो व्यापारी बुडणार होता. चालले तर भाडे, पगार व प्रशिक्षण या गोष्टी गोमाजीपंतांना मिळणारच होत्या.

गोमाजीपंतांचा भाडेकरू निश्चितच जास्त नफा कमवत होता. हा नफा 'बाहेर' जात होता. त्यामानाने सोमाजीपंतांना द्यावे लागणारे व्याज कमी होते. यामुळे लोक गोमाजीपंतांना म्हणत की 'तो' एवढं कमावतोय पण तुम्हाला भाडे व पगार कमीच देतोय. पण गोमाजीपंत दुकानदाराशी स्वतःची तुलना करून दुःख करत बसले नाहीत. त्यांचा विचार असा की

"जे दुकान माझे नाहीच त्यातील नफ्यावर मी हक्क का म्हणून सांगावा? मी जागा दिली, मुलगा श्रम देतोय त्याचा मोबदला मिळतोय !" ही संधी सोडली तर तेही मिळणार नाहीये, ही गोम गोमाजीपंतांनी अचूक ओळखली. व्यवहारात तुलना ही आपली समोरच्याशी करायची नसून, आपल्या हल्लीच्या स्थितीची तुलना आपल्याच पूर्वीच्या स्थितीशी करायची असते हे मर्म त्यांनी जाणले होते.

परकीय कर्ज आणि परकीय गुंतवणूक यातील फरक स्पष्ट करण्यापुरतेच हे उदाहरण होते. हा फरक लक्षात घेतल्यावर 'कर्ज की गुंतवणूक' याबाबतीत देशाची काय स्थिती आहे ते आता पाहू.

**पैसा बाहेर कोण नेते?**

१९९५ साली भारताचे ९३.८ अब्ज डॉलर हे परकीय कर्ज (भारताच्या) एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या २९% आहे! या ९३.८ अब्ज डॉलर्सपैकी ७९.७ अब्ज डॉलर्स म्हणजे ८५% कर्ज हे 'सार्वजनिकरीत्या हमीपात्र कर्ज' या सदरात मोडते. (स्टॅ. आउटलाइन कोष्टक क्र. १९२) केंद्र व राज्यसरकारे, सार्वजनिक उद्योग, व सरकारने ज्यांच्या परतफेडीची हमी घेतली आहे असे खासगी 'भारतीय' उद्योग, अशा सान्यांच्या नावे असणारे हे कर्ज आहे. त्यामानाने बाहेरून गुंतवणूक घेण्याचे प्रमाण फारच कमी आहे.

"भारताचा पैसा भारताबाहेर जातो." ही बाळबोध तक्रार वादापुरती ग्राह्य मानली तरी तो मुख्यतः कोणामुळे जातो हे पाहिले तर असे आढळून येते की तो मुख्यतः कर्जबाजारी वृत्तीच्या स्वकीयांमुळे जातो. 'परकीय' कंपन्यांमुळे नव्हे!

याचे ढळढळीत उदाहरण १९९०-९१ साली दिसते. या वर्षी विदेशी कोलॅबोरेशनपोटी व गुंतवणुकीपोटी पाठवलेला नफा, तंत्रज्ञानाची फी, रॉयल्टी वगैरे मिळून सर्व 'परतावा' हा फक्त १२.५ कोटी डॉलर्स होता. (स्टॅ. आउटलाईन. कोष्टक १६१) तर १९९० साली आपण केलेली कर्ज हप्ताफेड (व्याज व अंशतः मुद्दल) मात्र होती तब्बल ८२२.३ कोटी डॉलर्स! (स्टॅ. आउटलाइन कोष्टक १९२)

परकीय कर्ज वाढत का गेले? आपण आयात टाळण्यासाठी आंतरराष्ट्रीय व्यापारच टाळायचा प्रयत्न केला. 'स्वदेशी' उद्योगांना

संरक्षण देण्याच्या नादात मक्तेदाऱ्या निर्माण केल्या. परिणामी अकार्यक्षमता वाढली. आणि आयात मात्र पुरेशी घटली नाहीच. निर्यातीकडे दुर्लक्ष केले व इतकेच नव्हे तर निर्यातीत अडथळेही निर्माण केले. निर्यात नेहमीच आयातीपेक्षा कमी राहिली. यामुळे दरवर्षी आयात निर्यात यांच्यात व्यापारी तूट (ट्रेड डेफिसिट) येत गेली. ही तूट आपण सतत परकीय कर्ज काढून भरून काढत राहिलो. या खेरीज कर्जाचा वापरही अनुत्पादक व अपव्ययकारक असा करत राहिलो, ही व अशी कारणे अभ्यासून कर्जाच्या समस्येवर उपाय शोधता येतील.

पण खरा प्रश्न असा आहे की परकीय गुंतवणूकीला विरोध करण्याने परकीय कर्ज कसे कमी होईल? गोमाजीपंतांवर बंदी घातल्याने सोमाजीपंतांचा आतबट्ट्याचा व्यवहार कसा थांबेल?

**तेव्हाची साम्राज्यशाही व आजची जागतिक भांडवलशाही**

स्वातंत्र्यलढ्याच्या काळात परकीय मालाची होळी वगैरे केली जात असे तेव्हा 'परकीय माल' याला विशिष्ट अर्थ होता. आपल्या कापसावर इंग्लंडच्या कामगारांनी काम करून कापड बनवायचे व ते आपल्यालाच विकायचे असा प्रकार होता. म्हणजे निर्यात मुख्यतः नैसर्गिक साधनसंपत्तीची होणार किंवा शेतीसदृश प्राथमिक क्षेत्रातून होणार व कारखानदारी परदेशातच चालून पक्का माल आयात होणार, असा तो प्रकार होता.

याउलट अलीकडे म्हणजे उदाहरणार्थ १९९५ साली आपण जी ३०.८ अब्ज डॉलर्सची निर्यात केली तिच्यात मॅन्युफॅक्चरिंगचा वाटा ७५% होता. (चीनच्या निर्यातीत तो ८१% तर सौदी अरेबियाच्या निर्यातीत फक्त ९% होता) म्हणजे आता मात्र श्रम करण्याची संधी भारतीय श्रमिकांना मिळू लागली आहे.

दुसरे असे की पूर्वीची साम्राज्यशाही ही भांडवलसंचय करण्याची प्रचंड भूक असलेली साम्राज्यशाही होती. तिला आपली लूट करण्यात फायदा होता. प्रगत देशांपुढील आजचे प्रश्न अगदी वेगळे आहेत. त्यांच्या भांडवलाला गुंतवणूक संधी मिळत नाहीयेत. भांडवलपुरवठा भरपूर असल्याने व्याजदर खाली गेले आहेत. त्यांच्या ग्राहकांच्याही बऱ्याच गोष्टी खरेदी करून झाल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या बाजारपेठा विस्तारत नाही आहेत. हे प्रश्न 'त्यांनी' 'आपल्याला' लुटून सुटणारे प्रश्न नाहीत.

आता 'आपल्या' श्रमांनी संधी दिल्याखेरीज व 'आपल्या' ग्राहकांना क्रयशक्ती दिल्याखेरीज 'त्यांचा' खेळ चालूच शकणार नाहीये. कोणत्याही खेळाडूचा एक हितसंबंध जिंकण्यात गुंतलेला असतो हे खरेच आहे. पण प्रत्येक खेळाडूचा दुसरा हितसंबंध खेळ चालू रहावा, यातही गुंतलेला असतो. हरलेल्याला खलास करून खेळ चालू रहात नसतो. केन्सोत्तर भांडवलशाही ही, खेळ चालू राखण्याचे शहाणपण आलेली प्रगल्भ भांडवलशाही आहे हे कदापीही विसरून चालणार नाही.

पण दुर्दैवाने आपली राजकीय अर्थशास्त्राची समज ही वसाहतकालीनच राहीली आहे. आणि वास्तव मात्र नव्या जागतिक अर्थव्यवस्थेचे वास्तव आहे. यातील संधी ओळखून डेंगचा चीन स्वतःकडे गुंतवणूक व निर्यातसंधी खेचून घेत आहे. आपण मात्र दादाभाई नौरोजींच्या काळात वावरत असल्यासारखे गुंतवणूक रोखायला सज्ज झालो आहोत.

■■■

# जागतिकीकरण व भारतीय अर्थव्यवस्था

डॉ. अनंत फडके

*[ भारतीय अर्थविज्ञान वर्धिनीच्या चर्चागटाच्या "स्वदेशी" वरील बैठकीसाठी अभ्याससाहित्य म्हणून श्री. राजीव साने यांच्या "ज्वलंत स्वदेशी - साधक आणि बाधक" (किस्त्रीम दिवाळी अंक ९८) या लेखाच्या संक्षिप्तरुपातील टिपणाच्या प्रति वितरीत करण्यात आल्या होत्या. ह्या लेखातील काही विधानांच्या संदर्भातील प्रतिक्रिया नोंदवणारे टिपण. ]*

'ज्वलंत स्वदेशी, साधक आणि बाधक (संक्षिप्त)' या राजीव साने यांच्या लेखात 'स्वदेशी माल वापरा' ही चळवळ आज आर्थिक दृष्ट्या कशी निरर्थक बनली आहे हे स्पष्टपणे, मार्मिकपणे मांडले आहे. पण त्यांनी या लेखात घेतलेल्या इतर अनेक भूमिका, केलेली विधाने फार एकांगी व काहीशी दिशाभूल करणारी आहेत, हे या छोट्या टिपणात थोडक्यात मांडले आहे. हेतू हा की, या आकर्षक लेखातून भारतीय अर्थव्यवस्थेच्या समस्यांवर किंवा विकासाच्या अर्थशास्त्रावर काही अर्थपूर्ण प्रकाश पडत नाही हे स्पष्ट व्हावे. त्यासाठी या लेखातील काही महत्वाच्या विधानांचा परामर्ष घेऊ.

*(१) "इतर जगाने भारताकडून पैसा मिळवला (मग तो कोणत्याही चलनात येन, डॉलर, पौंड वगैरे असे) पण भारताकडून काहीच आयात केले नाही, तर हा पैसा वसूलच होत नाही."*

असे लेखाच्या सुरूवातीस राजीव सानेंचे प्रतिपादन आहे. ते चुकीचे आहे. भारतात परकीय कंपन्या जो नफा कमवतात त्यातून ते डॉलर्स विकत घेऊ शकतात व या डॉलर्समधून आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत त्यांना हवा तो माल खरेदी करू शकतात, त्यासाठी भारतातून त्यांना माल खरेदी करायची गरज नाही. विसाव्या शतकाच्या सुरूवातीस (तीशीमध्ये) जर्मनीकडून दंड वसूल करण्याचे आंतरराष्ट्रीय व्यापारावर होणारे परिणाम व आता परकीय कंपन्यांनी भारतात मिळवलेल्या नफ्याचे या व्यापारावर होणारे परिणाम यात गुणात्मक फरक आहे, हे साने विसरतात हे फार आश्चर्यकारक आहे.

(२) *"आपण हे फुकट ते फुकट अशा फुकट कल्याणी निराधार योजना राबवतो. म्हणजेच, थोडक्यात वित्तीय त्रुटीचे अर्थकारण करतो." असे श्री. साने यांचे एक प्रतिपादन आहे.*

एक म्हणजे कल्याणकारी योजनांबाबत अनुदान, प्रतिमानी दृष्टिकोन त्यांच्या या वाक्यरचनेत डोकावतो. म्हातारी व इतर निराधार माणसे यांच्यासाठी कल्याणकारी योजना राबवणे हे आधुनिक भांडवली शासनाचे कर्तव्य आहे. दुसरे म्हणजे कल्याणकारी योजनांमधून खरेदीशक्ती तयार करणे व त्यातून अर्थव्यवस्थेला चालना देणे हा कीन्सवादी धोरणातील महत्वाचा भाग आहे. म्हातार्‍या-कोतार्‍यांसाठी कल्याणकारी योजना या भांडवली अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने 'अनुत्पादक' समजल्या जातात. पण प्रौढ कामकरी जनतेसाठी 'फुकट' शिक्षण, आरोग्य-सेवा इ. सेवा पुरवणे हे युद्धोत्तर युरोपीय आर्थिक उत्थापनातील एक महत्वाचा घटक होता. 'कल्याणकारी योजना म्हणजे तुटीचे अर्थकारण म्हणजेच 'वाईट अर्थकारण' हे समीकरण चुकीचे आहे. कल्याणकारी योजना किती प्रमाणात आहेत, कोणत्या आहेत, कशा राबवल्या जात आहेत यावर सर्व अवलंबून असते.

(३) *"जी गोष्ट बनवायला जास्त श्रम लागतात ती गोष्ट जास्त रोजगार निर्माण करेल असे गृहित धरणे बरोबर नाही"*

हे साने यांचे म्हणणे योग्य आहे. पण हा मुद्दा पटवण्यासाठी त्यांनी दिलेले उदाहरण पर्याप्त नाही. *"इलेक्ट्रॉनिक घड्याळे आल्यावर जरी एका घड्याळामागे लागणारे श्रम खूपच कमी झाले तरी घड्याळे स्वस्त झाली. खूपच जास्त जणांना ती परवडू लागली. त्यांची मागणी प्रचंड वाढली आणि अर्थातच उत्पादन व रोजगार ही वाढला..."* असे साने या संदर्भात उदाहरणार्थ मांडतात.

घड्याळे स्वस्त झाल्याने मागणी वाढली म्हणजे काय झाले? समजा आधी घड्याळामागे १०० रु. प्रमाणे १ कोटी लोक घड्याळे दरवर्षी घेत होती. आता समजा दहा रुपयाला इलेक्ट्रॉनिक घड्याळ मिळू लागले त्यामुळे समजा आता दहा कोटी लोक घड्याळे घेऊ लागले. तरी एकूण बाजारपेठ १०० कोटी रु.चीच राहील. त्यामुळे खुद्द घड्याळ्याच्या उद्योगातील रोजगार वाढणार नाही. उलट नवा इलेक्ट्रॉनिक घड्याळ उद्योग अधिक भांडवलप्रचुर असेल तर या धंद्यात रोजगार कमी होईल.

(मात्र या नव्या उद्योगाला माल पुरवणारा नवा उद्योग वाढेल व जुन्या घड्याळ-उद्योगातील मंदीमुळे येणारी बेकारी कदाचित त्यातून कमी होऊ शकेल.)

(४) *"परकीय कर्ज हे स्वकीयांनी केलेले कर्ज असते. ते फेडण्याची जबाबदारी स्वकीयांच्या शिरावर असते. परंतु परकीय गुंतवणुकीत जबाबदारी त्यांची? व उत्पादन साधनांची उभारणी मात्र 'आपल्या' देशात अशी परिस्थिती असते."*

ही सानेंनी केलेली तुलना अपुरी व दिशाभूल करणारी आहे. सानेंनी हे ही स्पष्ट करायला हवे होते की परकीय कर्ज वापरून निर्माण केलेली सर्व संपत्ती व वरकड कर्जदाराच्या मालकीचे असते. कर्ज फेडून, त्यावरचे व्याज भरून आपली संपत्ती, नफा वाढेल ही भूमिका कर्ज घेतांना गृहीत असते. कर्ज नीट न वापरता उधळून टाकले तरच गणित बिघडते. त्यामुळे मुद्दा कर्ज चांगले का वाईट असा नसून ते नीट वापरायचे का अनुत्पादक रितीने खर्च करून टाकायचे हा आहे. साने यांना हेच म्हणायचे असेलही. पण पद्धत गैरसमजुतीला वाव देणारी आहे.

दुसरे म्हणजे परकीय कर्ज वा गुंतवणूक ही केवळ परकीय आहेत म्हणून त्यांना विरोध करणे चूक आहे. भारतातील परकीय गुंतवणुकीला 'डावे' विरोध करतात कारण ती गुंतवणूक साम्राज्यवादी करीत आहेत. म्हणून साम्राज्यवादी गुंतवणुकीतून भांडवली विकास होतो हे खरे आहे. पण तो साम्राज्यवाद्यांना हव्या त्या दिशेने, त्या पद्धतीने, अवलंबित्व लादणारा भांडवली विकास असतो. उदा. औषध उद्योगाच्या क्षेत्रात भारतात बहुराष्ट्रीय कंपन्यांनी काय 'कामगिरी' केली आहे याचा आढावा थोडक्यात मी एका छोट्या लेखात घेतला आहे. 'बहुराष्ट्रीय कंपन्यांना मुक्त प्रवेश कशासाठी?' हा लेख (सा.सकाळ २९/८/९२ या अंकात प्रसिद्ध झाला आहे.) या ठोस वास्तवाच्या पार्श्वभूमीवर सध्याच्या साम्राज्यशाहीबाबत चर्चा करायला हवी.

साम्राज्यशाही मुळापासून बदलली आहे अशी श्री. साने यांची समजूत झाली असावी. 'तेव्हाची साम्राज्यशाही व आजची जागतिक भांडवलशाही' या शीर्षकाखाली ते म्हणतात".....

*(५) पूर्वीची साम्राज्यशाही ही भांडवल संचय करण्याची प्रचंड भूक असलेली साम्राज्यशाही होती. तिला आपली लूट करण्यात फायदा होता. प्रगत देशांपुढील आजचे प्रश्न अगदी वेगळे आहेत. त्यांच्या भांडवलगुंतवणुकीला संधी मिळत नाहीयेत्..... त्यांच्या बाजारपेठा विस्तारत नाही आहेत. हे प्रश्न त्यांनी 'आपल्याला' लुटून सुटणारे प्रश्न नाहीत."*

आधुनिक साम्राज्यशाही म्हणजे काय याची मूलभूत समजही साने विसरलेले दिसतात. साम्राज्यशाहीला भांडवल संचयाची भूक वा गरज तेव्हाही (विसाव्या शतकाच्या सुरूवातीला होती) व आजही तितकीच आहे. कारण भांडवलशाहीच्या साम्राज्यशाहीचा तो मूलभूत गुणधर्म आहे. साम्राज्यवादी भांडवलाला स्वतःच्या देशात नफेशीर गुंतवणुकीला संधी कमी होती व म्हणूनच ते देशाच्या बाहेर गुंतवणुकीला वाटा शोधत होते. तेव्हाही व आजही गुंतवणूक मुख्यतः प्रगत भांडवली देशातच होत होती. पण त्याचबरोबर मागास देशात गुंतवणूक करणे, याला विशेष महत्व होते कारण या देशांमध्ये जास्त दराने नफा कमावता येत होता व अजूनही येतो. शिवाय काही महत्वाची खनिजे व निसर्गसंपत्ती यांच्यावर ताबा ठेवण्याची तेव्हाही गरज होती व आजही गरज आहे. लूट तेव्हाही होत होती व आजही होत आहे. दुसरे म्हणजे मागास देशांची लूट होणे व शिवाय तिथे भांडवलाची निर्यात होणे हे दोन्हीही एकाच वेळी होते हे साने लक्षात घेत नाहीत. मागास देशातील श्रमिकांच्या श्रमातून तयार झालेला नफा हा सर्व तिथे न गुंतवला जाता, साम्राज्यवाद्यांनी त्यातील काही भाग परदेशी नेणे म्हणजे तिसऱ्या जगातील देशांची होणारी आधुनिक साम्राज्यवादी लूट ही मार्क्सवादी, शास्त्रीय, समाजवादी संकल्पना बाजूला ठेवून चालणार नाही. साम्राज्यशाही आता पुन्हा एकदा कात टाकून नव्या स्वरुपात आकाराला येत आहे. या नव्या, अत्याधुनिक साम्राज्यशाहीची वैशिष्ट्ये काय, त्यातील अंतर्विरोध कोणते याची पद्धतशीर चर्चा व्हायला हवी. पण मूलभूत पैलूंचा विसर पडून चालणार नाही.

राजीव साने यांच्या लेखातील फक्त काही विधानांचा परामर्ष या छोट्या टिपणात घेतला आहे. कारण सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे या टिपणाचा हेतू मर्यादित आहे.

■■■

# अनावश्यक सदोष माल लादून घेणे म्हणजे जागतिकीकरण की काय !

**वसंत श्री. पटवर्धन**

*[सदर लेख 'अर्थभारती सेवा' नोव्हेंबर ९८ च्या अकात प्रसिद्ध झाला आहे. त्यातील निवडक मुद्दे घेऊन हा लेख संक्षिप्त करण्यात आला आहे.]*

खुल्या अर्थव्यवस्थेचा व जागतिकीकरणाचा स्वीकार केल्यानंतर गेल्या पाच-सात वर्षात जे परिणाम दिसून येत आहेत ते फारसे प्रोत्साहक नाहीत. येथील उद्योगसंस्थांना प्रतिकूल असेच आहेत. नव्या आर्थिक धोरणाचे परिणाम उद्योग-वस्तू उत्पादन क्षेत्रात, सामाजिक/सांस्कृतिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर होत आहेत.

**उद्योग क्षेत्र** - उत्पादन क्षेत्रात म्हणजे देशांतर्गत 'बाजार' क्षेत्रात परकीय उद्योग संस्थांचा प्रवेश झाला आहे. ग्राहकोपयोगी टिकाऊ (Durable) आणि नाशवंत (Nondurable) वस्तूंच्या उत्पादन/विक्री क्षेत्रामध्ये विदेशी बहुराष्ट्रीय कंपन्यांनी आपले स्थान दिवसेंदिवस अधिक बळकट केले आहे. मद्य, सिगारेटसारख्या वस्तूंची बाजारपेठ विस्तृत करण्याचे त्यांचे प्रयत्न दिसून येत आहेत. दूरदर्शन, आकाशवाणी, वृत्तपत्रे आणि रस्तोरस्तीचे फलक या माध्यमांतून जाहिराती देऊन वरील सर्व वस्तू बाजारावर परकीय उत्पादक कंपन्यांचा पगडा बसू लागला आहे. "ग्राहक हा राजा" असतो (Consumer is Sovereign) या तथाकथित तत्त्वाचा बाजारांत वापर होत असला तरी ग्राहकांच्या आवडी/निवडी बदलण्याचे प्रयास जोरात चालू आहेत. नागरी व सुशिक्षित सधन वर्गाच्या तुलनेने मर्यादित बाजारपेठेवरच नव्हे तर ग्रामीण भागांतील बाजारामध्ये सुद्धा अशा काही गरजेच्या आणि काही चैनीच्या वस्तूंच्या विक्रीचा प्रसार वाढवून त्यांची आवड बदलण्याचे प्रयत्न जारीने होताना दिसतात. जेथे तुलनेने भांडवलाचा वापर कमी आणि नफा त्वरित मिळण्याची शक्यता असते, अशाच क्षेत्रात परकीय उद्योगसंस्था व भांडवलाचा प्रवेश झालेला दिसतो.

**भारतीय उद्योग अडचणीत**

१९९१-९२ मध्ये आयात कर सरासरी १२०% होता तो ९७-९८ मध्ये ४०% इतका कमी करण्यात आला आहे. अशा रीतीने आयातीवरील

निर्बंध कमी झाल्यामुळे, सीमाशुल्क कमी होत गेल्यामुळे आयात वस्तूंच्या किंमती कमी झाल्या. त्यामुळे येथील उद्योजकांना देशात होणाऱ्या आयात मालाशी स्पर्धा करणे कठीण होत आहे असे दिसते. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या आक्रमणाला तोंड देण्यास असमर्थ झाल्यामुळे (म्हणजेच बहुराष्ट्रीय कंपन्या करीत असलेल्या आयातीला तोंड देण्यास स्पर्धेत टिकून राहण्यास अयशस्वी झाल्यामुळे) देशातील ५० कंपन्यांपैकी २२ कंपन्या मेटाकुटीस आल्याचे बी.आय.एफ.आर. ('बोर्ड फॉर इंडस्ट्रियल अँड फायनान्शियल रिकन्स्ट्रक्शन' - आजारी कंपन्या/ उद्योगधंद्यांना साहाय्य देणारी भारतीय संस्था) च्या १९९७-९८ च्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. चीन, कोरिया, इंडोनेशिया मधून स्वस्त मालाची आयात होत असल्यामुळे या भारतीय कंपन्या अडचणीत सापडल्या आहेत, असे सदर अहवालात म्हटले आहे. अशा आजारी पडलेल्या कंपन्यांच्या कारभाराला इतरही अनेक कारणे आहेत. पण बी.आय.एफ.आर. चा हा अहवाल बोलका आहे. (संदर्भ : इकॉनॉमिक टाइम्स, २२-९-९८) बाजाराभिमुख (Market-Oriented) किंवा बाजाराधिष्ठित अर्थव्यवस्थेमध्ये उत्पादक उद्योगांना आपला माल, दर्जा आणि किंमत या दोन्ही दृष्टींनी सरस आणि ग्राहकास रुचेल/परवडेल असा ठेवण्याचा प्रयत्न करावा लागतो. महत्त्वाची गोष्ट म्हणजे अशा स्पर्धेत एतद्देशीय तुलनेने लहान (आकार, उत्पादन व उलाढाल) उद्योगांना प्रचंड भांडवल, विक्रीव्यवस्था यांचे पाठबळ असलेल्या परकीय उत्पादित मालाला तोंड देणे शक्य आहे का? याच कारणाने क्वालिटी आईसक्रीम, ड्यूक/पार्ले या येथील जुन्या पेय कंपन्यांची उत्पादने, परकीय कंपन्यांनी गिळंकृत केली.

'बाजार' खुला होण्याचे परिणाम हळूहळू स्पष्ट होत आहेत. अर्थशास्त्रीय परिभाषेत 'मुक्त' किंवा 'पूर्ण स्पर्धा' सहसा कोठेच अस्तित्वात नसते. बाजारावर काही मूठभर कंपन्यांचा प्रभाव असतो. त्यामुळे बाजारात वस्तुव्यापाराचे संकेंद्रण (Concentration) होत असते. संकेंद्रण वाढणे हे बाजाराच्या आणि ग्राहकांच्या हिताचे असत नाही. गेल्या ६/७ वर्षात अशा तऱ्हेने संकेंद्रणाचे भ्रमण खुल्या अर्थव्यवस्थेत वाढलेले असावे. औद्योगिक क्षेत्रात सध्या समस्तरीय - विलीनीकरण (Horizontal amalgamation), विलीनकरण (Merger) ह्या प्रक्रियांना वेग आलेला दिसतो. अर्थशास्त्रीय सिद्धांतनानुसार तत्त्वतः खुला बाजार समाजाच्या हिताचा असतो, परंतु

प्रत्यक्ष व्यवहारात खुल्या बाजारात मूठभर मोठ्या उत्पादकांचे प्रभावक्षेत्र बाजारावर वाढत जाते. परिणामी ते ग्राहकांच्या हिताचे असत नाही.

## लघुउद्योगही आक्रमणाचे बळी

खुल्या आणि बाजाराभिमुख अर्थव्यवस्थेच्या प्रभावामुळे लहान आणि मध्यम उद्योग अडचणीत येत आहेत. साबण, ब्रेड/बेकरी, चर्मोद्योग, तयार कपडे, खाद्यतेले असे गरजेचे ग्राहकोपयोगी वस्तू-उद्योगच नव्हे तर मोठ्या अभियांत्रिकी कंपन्यांना सुटे भाग पुरविण्याचे काम करणारे लघुउद्योगही सध्या बाजारावरील मोठ्या कंपन्यांच्या आक्रमणाचे बळी ठरत आहेत.

भांडवली उत्पादकतेच्या दृष्टीकोनातून (Capital Efficiency) लघुउद्योग जरी कार्यक्षम नसले तरी भारतासारख्या विकसनशील देशात त्यांचे स्थान अनन्यसाधारण आहे. त्यांच्या उत्पादनांमुळे रोजगार निर्मितीस हातभार लागतो. लहानलहान उद्योजकांना प्रोत्साहन मिळते. म्हणून खुल्या अर्थव्यवस्थेतील मोठ्या उद्योगघटकांच्या प्राबल्यामुळे विखुरीत लघुउद्योग, ग्रामीण उद्योग अडचणीत येतात.

## रोजगार निर्मितीवर परिणाम

भारतात असंघटित उद्योग क्षेत्र अजून पुष्कळ व्यापक आणि विखुरलेले आहे आणि तसे ते राहणेही आवश्यक आहे. मोठ्या उद्योगात रोजगार निर्मितीचा वेग कमी असतो. गेल्या दशकात मोठ्या उद्योगात नवीन रोजगार निर्मितीचा वेग मंदावत चालला आहे. त्याचे कारण उद्योगाचे आकारमान वाढते ठेवण्यासाठी तो भांडवल - सघन असावा लागतो. भांडवल - सघनतेचा अर्थ त्यात अधिकाधिक यांत्रिकीकरण होते असा आहे. त्यामुळे रोजगार निर्मिती कमी होते. दुसऱ्या बाजूस शेती क्षेत्रातील रोजगारांचा भार शेतीवर न ठेवता शेतीबाहेर रोजगार पुरविण्याची गरज असते. या परिस्थितीत असंघटित दुय्यम उद्योग क्षेत्रात रोजगार निर्माण करणे गरजेचे व शक्यही असते. त्याकरिता लघु असंघटित क्षेत्राचा विकास आणि वाढ होणे आवश्यक आहे, म्हणून खुल्या अर्थव्यवस्थेचे लघु/विखुरलेल्या उद्योगांवर होणारे दुष्परिणाम टाळण्याची जबाबदारी शासनावर येते.

**शासनाने जनहित जपावे**

आर्थिक सुधारणा म्हणजेच खुला व्यापार, खुली बाजारपेठ, जागतिकीकरण आणि खाजगीकरण हे समीकरण तत्त्वतः मान्य करताना शासनाचे कार्य काय हा कळीचा मुद्दा ठरतो. मद्य, सिगारेट, चैनीची खाद्यान्ने यांचा प्रसार आणि प्रचार सामान्य ग्राहकाच्या हिताचा नाही हे उघड झाले आहे. म्हणून शासनाने या वस्तूंच्या प्रसारावर, त्यांच्या सेवनावर आळा घातला पाहिजे.

काही वेळा बहुराष्ट्रीय कंपन्यांची उत्पादने आणि माल संशयास्पद दर्जाचा असतो. जर्मनी, स्वित्झर्लंड, अमेरिका, इंग्लंड अशा त्यांच्या त्यांच्या मायदेशात काही उत्पादनांवर बंदी घातली जाते. कारण त्यांचा दर्जा कमी असतो किंवा त्यांचा ग्राहकांवर दुष्परिणाम झाल्याचे आढळते. विशेषतः औषधी व्यापारात अशा घटना घडल्या आहेत. तरीही या बहुराष्ट्रीय कंपन्या बेदरकारपणे त्यांची ती उत्पादने भारतासारख्या औद्योगिकदृष्ट्या अप्रगत देशात खपवितात. भारतीय ग्राहक संरक्षण कायदा अपुरा व येथील प्रशासन अकार्यक्षम असल्यामुळे बहुराष्ट्रीय कंपन्या येथील बाजारात ग्राहकांची फसवणूक करून, त्यांचे शोषण करतात. म्हणून शासनाने यासंबंधी त्रयस्थ पंचाप्रमाणे अशा बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या व्यवहारांवर काळजीपूर्वक निर्बंध घातले पाहिजेत. खुला बाजार किंवा खुली अर्थव्यवस्था म्हणजे ग्राहकांची फसवणूक करण्याचा किंवा त्यांचे शोषण करण्याचा खुला परवाना नव्हे. म्हणून खुल्या अर्थव्यवस्थेमध्ये शासनाची भूमिका त्रयस्थपणे पर्यवेक्षकाची असावयास हवी.

**लोकशिक्षणाला महत्त्व हवे**

शिथिलीकरण आणि जागतिकीकरणामुळे वस्तूंच्या विक्रीचे, त्यांच्या जाहिरातीचे प्रमाण वाढून युवा पिढीवर त्याचे दुष्परिणाम दिसू लागले आहेत. दूरदर्शनसारख्या प्रसार माध्यमांचा याबाबतीत मोठा प्रभाव होतो. तेव्हा या संदर्भात शासनाची भूमिका केवळ बघ्याची असून चालणार नाही. हे माध्यम सुरुवातीस लोकशिक्षणास उपयुक्त ठरेल म्हणून त्याचे स्वागत झाले. पण या माध्यमाचा कालांतराने करमणुकीचे साधन म्हणूनच बव्हंशी वापर होत आहे. अशा प्रकारे जाहिरातींद्वारा सामान्य ग्राहकांना चंगळवादी ग्राहकवस्तू (Consumer Goods) खरेदी करण्यास प्रवृत्त

करण्यासाठी किती प्रचंड प्रमाणावर खर्च करण्यात येतो ते पाहण्यासारखे आहे. १९९७ च्या जानेवारी ते सप्टेंबर या नऊ महिन्यांत दूरदर्शनवरील जाहिरातींसाठी खालील प्रमाणे खर्च करण्यात आला. दंतमंजने ८६ कोटी रु., डिटर्जंट पावडर ६८ कोटी रु., शीतपेये ५६ कोटी रु., साड्या ८३ कोटी रु. इत्यादि. हा खर्च शेवटी ग्राहकांच्याच माथी पडतो. त्याचा लोकशिक्षणासाठी, लोकसंख्या नियोजन, सार्वत्रिक साक्षरता, स्वच्छता, औद्योगिकी-करणासारख्या महत्त्वाच्या ज्वलंत विषयावर जनजागरण करण्यास फारसा उपयोग केला जात नाही असे दिसते. कारण खाजगी वाहिन्या या देशातील सामाजिक, आर्थिक प्रश्नांसंबंधी उदासीन राहतात आणि नफ्याच्या मागे लागून केवळ मनोरंजनाचे निकृष्ट कार्यक्रम सादर करतात. ही बाबही खुल्या आर्थिक धोरणामुळे शासनाच्या अखत्यारीत उरलेली नाही असे दिसते. ही स्थिती धोक्याची व घातक ठरते.

सारांश, जागतिक स्पर्धेस भारतीय उद्योग/व्यापारी संस्था सक्षमपणे सामोरे जाऊ शकल्या पाहिजेत हा हेतू स्तुत्य असला तरी तो विकसनशील देशांची विशिष्ट अवस्था लक्षात घेता त्यांच्या हिताचा राहीलच असे मानणे कठीण आहे. स्पर्धेत भाग घेणारे स्पर्धक सामान्यतः किमान विशिष्ट पातळीवर असले तरच ती स्पर्धा सर्व स्पर्धकांना न्यायाची असू शकते. पाश्चात्य प्रगत देशांना आता सोईस्कर आहे म्हणून त्यांनी जागतिक व्यापार संघटनेद्वारा (W.T.O.) खुल्या आयात/निर्यात व्यापाराचे धोरण तिसऱ्या जगातील देशावर लादले आहे, याची जाणीव व यातील धोके सर्वांपर्यंत पोचविणे आवश्यक आहे.

**अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने व्हावी**

प्रगत देशात लोकसंख्या वाढ जवळपास नगण्य आहे. त्यांच्या लोकसंख्येत शिक्षणाचे, तंत्रज्ञानाच्या प्रसाराचे प्रमाण खूप जास्त आहे. त्यांच्या परिस्थितीत व औद्योगिक विकासाच्या सध्याच्या टप्प्यात आणि भारतासारख्या देशाच्या टप्प्यात महदंतर आहे म्हणून त्यांना उपयुक्त ठरलेला, त्यांच्या विकास प्रक्रियेतील विकास तळाकडे जिरतो/मुरतो (Growth trickles down) हा सिद्धांत वा अनुभव आपल्या देशाला लागू होत नाही. गेल्या पन्नास वर्षांत, भारताच्या विकासाच्या मंद प्रक्रियेस शासनाच्या चुकीच्या धोरणाचे काही अंशी योगदान आहे हे खरे, परंतु

म्हणून एकदम आपल्या आर्थिक धोरणात १८० अंशाचे परिवर्तन करणे चुकीचे ठरते, न्यायाचे नाही.

म्हणून नव्या आर्थिक धोरणाचा - म्हणजेच, जागतिकीकरण, शिथिलीकरण, मुक्त अर्थव्यवस्था, खाजगीकरण या पैलूंचा - पाठपुरावा करताना आपल्या देशाने सबुरीने या धोरणाची अंमलबजावणी करावयास हवी. त्यामुळे मूठभर धनिक, वरिष्ठ/उच्च मध्यम वर्गास लाभ होणार असतील आणि बव्हंश ग्रामीण गरीब जनतेस नुकसान होणार असेल तर मुक्त अर्थव्यवस्थेचा पुरस्कार तारतम्याने केला पाहिजे.

**अर्थशास्त्र व स्वदेशी**

या पार्श्वभूमीवर 'स्वदेशी'च्या प्रसाराचे व 'एक दबाव गट' म्हणून शासकीय धोरणाला दिशा देण्याचे 'स्वदेशी' अभियानाचे स्थान अनन्यसाधारण आहे. पण अर्थशास्त्रात 'स्वदेशी'चे काही वेगळे सिद्धांतन आहे असे मानणे बरोबर नाही. 'स्वदेशी' विरुद्ध जागतिकीकरणाचे मुक्त अर्थव्यवस्थेचे धोरण असे जणू दोन तट देशात झालेले दिसतात. या संदर्भात अर्थशास्त्रीय सिद्धांतनाचा 'स्वदेशी' विचारात कितीसा भाग येतो याचा खुलासा होणे अगत्याचे आहे.

अर्थशास्त्राचे नियम आणि सिद्धांत सामान्यतः सर्व मानव समुहांना लागू असतात. आधुनिक अर्थशास्त्राची तात्विक आणि शास्त्र म्हणून सुरूवातीची उत्क्रांती प्रायः इंग्लंड, जर्मनी, ऑस्ट्रिया, फ्रान्स, इटली आदि युरोपीय देशातील तत्कालिन परिस्थितीनुसार झाली. नंतरच्या म्हणजे विसाव्या शतकात अर्थशास्त्राचा विकास अमेरिकेत झाला. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात विकसनशील आशियाई, आफ्रिकी व दक्षिण अमेरिकेतील देशांच्या परिस्थितीचा अभ्यास होऊन अर्थशास्त्रीय सिद्धांतनात प्रगती झाली. तरी अर्थशास्त्राची तत्त्वे, सिद्धांतन, सर्व जगातील सर्व मनुष्य समाजांना लागू होणारे आहे असेच दिसते. उदाहरणार्थ, मागणी/पुरवठा आणि त्यानुसार किंमतीतील चढउतार, घटत्या फळाचा सिद्धांत, व्यक्तींच्या उत्पन्नातील खाद्यवस्तूंवरील खर्चाच्या प्रमाणासंबंधीचा एंगल्स लॉ, मागणी/पुरवठ्याची किंमती संदर्भातील लवचिकता, ह्या सिद्धांतांचा सर्वदूर सारखाच अनुभव व परिणाम होत असतो. अमेरिकन, जपानी किंवा युरोपीय असे निरनिराळे विशिष्ट अर्थशास्त्र अस्तित्वात नाही.

काही विशिष्ट परिस्थितीत काही देशातील अप्रगत समाजात किंवा जनजातींमध्ये हे सिद्धांत सारखेच लागू होतात असे मात्र नाही. पण अशी स्थिती अपवादात्मकच मानली जाते. तेव्हा अर्थशास्त्राचे सिद्धांत सर्व देशात सारख्या प्रमाणात लागू होतात असे मानावयास हरकत नाही. त्याचे मुख्य कारण म्हणजे मनुष्यमात्र हा स्वार्थप्रेरणेवर ऐहिक जीवन जगत असतो. त्याचा अर्थविषयक किंवा संपत्तीविषयक व्यवहार या स्वार्थप्रेरणेतून होत असतो. तसेच मूलभूत गरजा पूर्ण झाल्यावर अधिक उत्पन्नाचा विनियोग तुलनेने सुख/सोई देणाऱ्या वस्तू व गरजा पुरविण्यात होतो आणि नंतर चैनीच्या वस्तूंचा त्यांच्या मागणीत क्रम लागतो.

**स्वदेशीची व्याप्ती मोठी**

'स्वदेशी'चा विचार हा अधिक व्यापक आहे. भारतात स्वदेशीचा प्रसार गेल्या शंभर वर्षात टिळक, गांधी, सावरकर या समाजधुरीणांनी राजकीय स्वातंत्र्य मिळविण्याच्या प्रयत्नात एक अस्त्र म्हणून केला. तरीही स्वदेशीचा प्रसार स्वातंत्र्य चळवळीच्या काळातही सर्वदूर आणि व्यापक झाला असे नाही. राजकीय आकांक्षांचे प्रतिबिंब अर्थशास्त्रीय व्यवहारात फारसे पडले नव्हते. 'स्वदेशी' विचार हा, शिक्षण, कुटुंब संस्था, सामाजिक अभिसरण, सांस्कृतिक वारसा आणि पार्श्वभूमी या सर्वांना व्यापणारा आहे. जगातील सर्व देशांच्या इतिहासात वेळोवेळी 'स्वदेशी' आणि राष्ट्रीय अस्मितेचा उपयोग राजकीय नेत्यांनी केलेला आढळतो. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात साम्यवादी रशियामध्ये सांस्कृतिक वारशाचा उल्लेख करताना स्टॅलिनने आपल्या देशाच्या इतिहास काळातील पीटर दि ग्रेट यांच्या साम्राज्याचा उल्लेख करून रशियन जनसामान्यांच्या देशभक्तीला आवाहन केले होते. सध्याही जागतिकीकरणाच्या काळात आपल्या आपल्या देशाच्या हिताचे म्हणून अमेरिका, इस्रायल, चीन, जपान सारख्या देशांनी, जे. जे वेळोवेळी योग्य वाटते त्याचा पाठपुरावा केला. सुपर-३०१ सारख्या अमेरिकी कायद्यांचा स्वार्थासाठी अमेरिका आजही सढळपणे वापर करीत असते.

सारांश, अर्थशास्त्रीय सिद्धांतन हा तत्त्वविचार आहे, तर स्वदेशीचा व्यवहार हा धोरणाचा भाग आहे. 'स्वदेशी' मध्ये केवळ अर्थशास्त्राचा विचार नसून सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक

पैलूंचाही विचार आणि आचार अभिप्रेत असतो. तो देशकालपरत्वे बदलता राहील याचीही नोंद घेणे अगत्याचे. चालू दशकामध्ये 'स्वदेशी' चे जे धोरण असेल ते पुढील दशकानंतरही तसेच राहील असे नाही. त्या धोरणात अल्पकालीन व दीर्घमुदतीच्या समस्यांचा विचार करावा लागेल. त्यामध्ये देशहिताचा विचार लवचिकपणे करावा लागेल. देशहिताचा म्हणजे समाजातील विशिष्ट गटांचा, वर्गांचा विचार न करता सर्व समाजातील विशेषतः शोषित, गरीब वर्गांचा, त्यांच्या हिताचा विचार तत्कालीन परिस्थितीनुसार करावा लागेल.

सारांश 'स्वदेशी'चे वेगळे अर्थशास्त्र असेल असे नाही. त्याची व्याप्ती अर्थशास्त्रीय विचार व अभ्यासापेक्षा पुष्कळ जास्त आणि मोठ्या परिघाची असेल.

■■■

# उद्योगांची स्पर्धाक्षमता : काही नावीन्यपूर्ण उपाय

जागतिकीकरणावरील चर्चेमध्ये भारतीय उद्योगांची स्पर्धाक्षमता हा एक महत्वाचा मुद्दा असतो. विविध प्रकारच्या बंधनांमध्ये पाच दशके अडकवून ठेवलेल्या भारतीय उद्योगांना अचानक परदेशी बड्या कंपन्यांशी स्पर्धा करावयास सांगणे हे कितपत योग्य? असा प्रश्न स्वदेशी उद्योगांचे समर्थक विचारतात. याउलट, इतक्या वर्षांच्या संरक्षणानंतर निदान आता तरी भारतीय कंपन्यांनी स्वतःच्या पायावर उभे राहायला हवे व परदेशी कंपन्यांशी स्पर्धा करायला हवी असे जागतिकीकरणाच्या समर्थकांचे म्हणणे असते. ह्या संदर्भातील चर्चा ह्या मुद्द्यांच्या फारशी पुढे सरकताना दिसत नाही. या संदर्भात प्रा. मार्ती सुब्रह्मण्यम (स्टर्न स्कूल ऑफ बिझिनेस, न्यूयॉर्क युनिव्हर्सिटी) यांनी तीन उपाय सुचविले आहेत.

१) भारतीय कंपन्यानी मध्यम आकाराच्या परदेशी कंपन्यांशी व्यापारी युती करणे : मात्र बहुराष्ट्रीय कंपन्यांशी अशी युती करण्यामध्ये फारसा अर्थ नाही, असे त्यांनी स्पष्ट केले आहे. एकतर मोठ्या भारतीय कंपन्यासुद्धा त्यांच्याशी समान पायावर व्यवहार करू शकणार नाहीत. त्याऐवजी भारतातील कंपन्यानी युरोप व अमेरीकेतील मध्यम आकाराच्या कंपन्यांशी युती करणे हे उभयपक्षी फायद्याचे ठरेल.

२) भारतीय कंपन्यांनी युरोप व अमेरीकेतील छोट्या कंपन्या ताब्यात घेणे : सध्याच्या आर्थिक परिस्थितीत विशेषतः युरोप अमेरीकेतील महागड्या मनुष्यबळामुळे ह्या छोट्या कंपन्या अडचणीत आलेल्या आहेत. मात्र ह्या कंपन्याकडे चांगले तंत्रज्ञान, नावाजलेली उत्पादने व बाजारपेठेतला पुरेसा वाटा ह्या महत्वाच्या गोष्टी असतात. भारतीय कंपन्यांनी ह्या छोट्या कंपन्या ताब्यात घेतल्यास दोन्हीकडच्या चांगल्या गोष्टींचा मेळ घालून त्यांना स्वतःचा भरपूर फायदा करून घेता येईल.

३) मनुष्यबळ आयात करणे : हा तिसरा उपाय मुख्यतः माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील कंपन्यासाठी जास्त योग्य ठरेल. तांत्रिक व व्यवस्थापन विभागातील मोक्याच्या जागा भरण्यासाठी परदेशातून मनुष्यबळ आयात केल्यास, इथल्या अनुकूल गोष्टींचा जास्त परिणामकारकरीत्या वापर करून भारतीय कंपन्या प्रगती करू शकतील.

ह्या पैकी योग्य मार्गाचा अवलंब करून भारतीय कंपन्या जागतिकीकरणाच्या वादळात ठामपणे उभ्या राहू शकतील असे प्रा. सुब्रह्मण्यम म्हणतात.

---

(बिझिनेस इंडिया (फेब्रुवारी २२ ते मार्च ७, १९९९) मधील "गेट ऑन विथ ग्लोबलायझेशन " ह्या लेखाच्या आधारे)

# स्वदेशी व जागतिकीकरण

## गजानन खातू

*[ भारतीय अर्थविज्ञान वर्धिनीच्या चर्चागटाच्या "स्वदेशी व जागतिकीकरण" या विषयावरील बैठकीसाठी सादर केलेले टिपण. ]*

१. चर्चेसाठी 'स्वदेशी व जागतिकीकरण' असा विषय देण्यात आला आहे. त्यातून या दोन संकल्पनामध्ये द्वंद्व व संघर्ष आहे व त्या परस्पर विरोधी आहेत असे सूचित होते. त्यामुळे 'हे तरी' नाहीतर 'ते तरी' स्वीकारा अशी भूमिका पुढे येते.

स्वदेशीच्या संदर्भात मुळात देश ही संकल्पनाच किती लवचिक आहे हे ध्यानात घ्यावे लागेल. म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळात भारत, पाकिस्तान, बांगला देश मिळून एकच देश होता व आता ते भिन्न देश आहेत, एवढ्या अर्थाने भारत हा स्वदेश व पाकिस्तान, बांगला देश परदेश ठरतात. उलट अनेक देश किंवा राष्ट्रे एकत्र येऊनही देश बनतो. म्हणजे ब्रिटीश पूर्व काळात भारतात अनेक स्वतंत्र संस्थाने किंवा देश होते व त्यांच्या एकत्रीकरणातून आधुनिक भारत देश किंवा राष्ट्र बनले आहे.

स्वदेशी, सादगी, स्वावलंबन या शब्दांना विशिष्ट एतिहासिक अर्थ प्राप्त झाले आहेत. त्यामुळे या शब्दांमधून नेमके काय म्हणायचे आहे याचा गोंधळ होतो ही दुसरी अडचण आहे. या शब्दांएवजी अन्य चपखल व अर्थवाही शब्द वापरता आले तर मांडणी करतांना अडचणी कमी होतील.

२. स्वदेशी शब्दाऐवजी भालचंद्र नेमाडे यांनी टीका स्वयंवर मध्ये वापरलेला 'देशीयता' हा शब्द अधिक समर्पक ठरू शकेल. अर्थात या देशीयतेचाही नीट खुलासा करावा लागेल. (जो बऱ्याच प्रमाणात नेमाडे यांनी संत तुकाराम व शेक्सपियरचे उदाहरण घेऊन केला आहे.) देशीयतेबरोबर, सादगी व स्वावलंबन यांचाही विचार करावा लागेल. या तिन्ही बाबींचा एकत्रित विचार केल्याशिवाय देशीयतेचे नीट स्पष्टीकरण होणार नाही.

देशीयता, सादगी व स्वावलंबन ही स्वयंसिद्ध मूल्ये म्हणून विचार न करता, शोषित समाजाच्या उत्थानासाठी, समतेसाठी आणि मानवाच्या चिरंतन विकासासाठी आवश्यक पूर्वअटी आहेत हे लक्षात घ्यावे लागेल.

त्यामुळे यातील कोणत्याच बाबीचे अवडंबर करण्याचे कारण नाही किंवा त्यासाठी देशप्रेम, देशद्रोह असल्या चक्रव्यूहात अडकण्याचे कारण नाही.

३. ज्याप्रमाणे स्वदेशी शब्दाबाबत अनेक घोळ आहेत तसेच सादगी व स्वावलंबन शब्दाबाबतही आहे. सादगीचा गांधीवादप्रणित अर्थ कमीतकमी उपभोग किंवा भौतिक सुखसोईचा त्याग या अर्थी प्रचारात आहे. हा अर्थ वापरला तर त्यातून अनेक समस्या निर्माण होतात. मुळात कोणत्या प्रकारच्या जीवनमानाला सादगी म्हणावे हाच प्रश्न येतो. असे काही जगण्याचे निकष काटेकोरपणे ठरवता येतात का? सर्व परिस्थितीत सर्व काळ व सर्व ठिकाणी सर्वासाठी तेच निकष लावणे व्यवहार्य आहे का? हा न सुटणारा गुंता होतो. मग अनेकदा सादगीचा पुरस्कार करणारांचे बाह्य जीवन साधेसुधे दिसते पण प्रत्यक्ष जीवनमान व जीवनपद्धती तशी नसते व यातून एक प्रकारचे ढोंग जोपासले जाते. यासाठी सादगी शब्द गुंतागुंतविरहित जीवन पद्धती म्हणून वापरला पाहिजे.

ज्याला आपण आधुनिक जीवन व व्यवस्था म्हणतो तिचे गुंतागुंत हे व्यवच्छेदक लक्षण झाले आहे. हे व्यक्तीजीवनापासून समाजजीवनापर्यंत खरे आहे. ही गुंतागुंत एका विकास प्रक्रियेत अपरिहार्यपणे आणि नकळत घडून आली व ती स्वीकारून समाज वाटचाल करीत आला. शेती समाजातील जीवनशैली व औद्योगिक समाजातील जीवनशैली यात महद्अंतर पडले. आता अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या व जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे जीवनशैलीत आणखी फरक पडणार आहे. आज व्यवहाराचे असे एक क्षेत्र नाही की ज्यामध्ये गुंतागुंत नाही. या गुंतागुंतीच्या स्वरूपाची इथे चर्चा न करता ती मान्य करून पुढे चर्चा करीत आहे. प्रश्न असा आहे की सुखी, समाधानी व समृद्ध जीवनासाठी अशी गुंतागुंतीची रचना व जीवनशैली अपरिहार्य आहे का? आणि गुंतागुंतीच्या अर्थरचनेतून सर्वांना सुखा-समाधानाचे जीवन लाभणे शक्य आहे का? मग जीवनाच्या साऱ्या गरजा भागविण्यासाठी कमी गुंतागुंतीची व्यवस्था अशक्य आहे का? अशी व्यवस्था अधिक समाधान देणारी नसेल का? आजही तालुक्याचे शहर व मुंबईसारखे महानगर यात तालुक्यातल्या शहरातील जीवनशैली अधिक आरामदायी व सोईची वाटते की नाही? अर्थात तरीही तिथल्या लोकांना मुंबईसारख्या शहराचे आकर्षण का वाटते

याचा विचार जरूर करावा लागेल. पण तालुक्याच्या ठिकाणचे जीवनात अनावश्यक धावपळ कमी होते, घराबाहेरच्या व्यवस्था, वाहतूक, वीज, हॉटेल याच्या गरजा कमी होतात, असे अनेक मुद्दे मांडता येतील.

याचा अर्थ पुन्हा जुन्या काळातल्या गाव रचनेत मागे जावे का? वास्तविक गेल्या कित्येक शतकाच्या पुढे जाण्याच्या प्रक्रियेत मागे जाण्याची निवडच (option) आता उरलेली नाही पण ज्या सुखाच्या शोधातून आपण गुंतागुंतीकडे आलो त्याचा जरूर पुर्नविचार करता येईल. ज्ञानेश्वर नाडकर्णी यांनी पिकासोवरील पुस्तकात पिकासोचे नवचित्रकलेवरील केलेले भाष्य हे या दृष्टीने मर्मग्राही वाटते. पिकासो म्हणतो कि नवचित्रकला दुर्बोध झाली आहे हे आमचे अपयश आहे. जेव्हा नवचित्रकला पूर्वीपेक्षाही सुबोध व अधिक अर्थवाही होईल, अधिकाधिक लोकांना भावेल तेव्हाच ती खऱ्या अर्थाने नवचित्रकला म्हणून सिद्ध होईल व चित्रकला विकसित झालेली असेल. गुंतागुंतीलाच आधुनिकता व विकास समजण्याची चूक आपण करीत आहोत. जेव्हा गुंतागुंतविरहित उच्च जीवन देणारी व्यवस्था येईल तेव्हाच ती खऱ्या अर्थाने आधुनिक असेल व ती जेव्हा तशी होईल तेव्हाच ती सादगीपूर्ण असेल. श्री. बाबूराव सामंत गौरव ग्रंथामध्ये ब्राझिलमधील क्युरूचिबा शहराची माहिती दिली आहे. या शहरात सार्वजनिक बस वाहतुकीसाठी खास 'लेन्स' ठेवल्यामुळे बस वाहतूक वेगाने होते. बसेस अधिक फेऱ्या करू शकत असल्याने अनेक प्रवासी बससेवेचा लाभ घेतात. अनेक प्रवासी असले तरी त्यांना बसमध्ये जागाही नीटपणे मिळते. या शहरातील लोकांना खाजगी गाडीची फारशी गरज राहिली नसल्याने ती न घेण्याचे ठरवले किंवा वापर कमी केला तर ते जीवन अधिक सादगीचे ठरेल.

एकदा हा दृष्टीकोन स्वीकारला तर सादगी या संकल्पनेचा जीवनाच्या अनेक क्षेत्रात विचार करता येईल. मग चिरंतन विकास, किंवा नैसर्गिक साधनसंपत्तीचा विनाश टाळणारा विकास या संकल्पना आपोआपच शक्यतेच्या पातळीवर येतील.

४. स्वावलंबन शब्द परस्परावलंबनच्या विरोधी वापरला गेला तर घोटाळा होईल. कारण समाज या शब्दातच परस्परावलंबन आहे. म्हणून स्वावलंबी समाज म्हणजे काय हे नीट समजून घ्यावे लागेल. टोळी समाज वगळता बहुधा कोणताच समाज स्वावलंबी नव्हता. समाजाचे

परस्परावलंबन व परस्पर सहकार्य हे त्याच्या विकासासाठी आवश्यकच आहे. तसे ते गाव समाजात होते आणि आताच्या शहर समाजातही आहे. पण या परस्परावलंबनामध्ये गुणात्मक फरक पडला आहे. त्याची नोंद घ्यावी लागते. कारण परस्परावलंबनाची सीमा ओलांडून समाज केंव्हा परावलंबी होतो हे समजत नाही. विकासाच्या नावाखाली परावलंबी होणारा समाज पांगळा होत जातो. विशेषतः आजच्या विकासप्रक्रियेतून जी असमानता निर्माण होते आहे त्याच्यातून दुर्बल समाजाचे परावलंबित्व तर क्लेशकारक ठरते. अनेकदा दुर्बल घटकांना दिल्या जाणाऱ्या अनुदानाबाबत बोलतांना, ज्या प्रक्रियेने त्यांना दुर्बल केले त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जाते व अनुदान घेण्याचा ते जणू गुन्हा करीत आहेत असे चित्र उभे केले जाते.

आजच्या व्यवस्थेने समाज घटकामध्ये, समाजा-समाजामध्ये, विभिन्न भूप्रदेशात आणि राष्ट्राराष्ट्रात परावलंबित्व निर्माण केले आहे ते भयावह आहे व तो शोषणाचा एक प्रमुख परिणाम आहे. म्हणून परावलंबनाकडून परस्परावलंबी समाजाकडे वाटचाल करायची तर स्वावलंबनाचा पुरस्कार करावा लागतो. परावलंबनाच्या विविध पैलूंचा आणि प्रक्रियेचा अधिक तपशीलवार विचार करता येणे शक्य आहे. तो, याठिकाणी केलेला नाही. वंदना शिवा यांनी 'ट्रान्सफर ऑफ रिसोर्सेसमध्ये' साधनसामुग्रीच्या हस्तांतराची तपशीलवार मांडणी केली आहे. ती तेथे अभिप्रेत आहे.

परावलंबित्व हे केवळ दोन देशातील व्यवहारातच घडून येते असे नाही तर देशातंर्गतही घडू शकते. उदाहरणार्थ भारतातील शेती उत्पादनांची देशभर देवाण-घेवाण होते. जवळपास सर्वच प्रांतात अन्नधान्याचे उत्पादन होत होते. परंतु हरित क्रान्तीनंतर देशातील अन्नाची गरज पंजाब हरियाणा आणि आंध्रप्रदेश प्रामुख्याने भागवू लागला. व एकेकाळी बरेचसे स्वावलंबी असलेले महाराष्ट्रासारखे राज्य, मधल्या काळात धान्य उत्पादनाचा आग्रह आणि आवश्यकता संपल्याने व अन्नधान्याची शेती बदललेल्या अर्थरचनेत तोट्याची ठरू लागल्याने आता परावलंबी झाले. उद्या जर पंजाब हरियाणातील हरित क्रांतीच्या जादूला ओहोटी लागती (जे काही अंशी घडते आहे.) तर देशाची 'फूड सिक्युरिटी' धोक्यात येईल. अशा प्रकारे विकास प्रक्रियेतील देशाची धान्य

उत्पादन व्यवस्था एका बाजूला अधिक गुंतागुंतीची, केंद्रित व त्याचवेळी परावलंबित्वाकडे नेणारी झाली आहे. अशावेळी प्रत्येक प्रांताने आपल्याला गरजेचे धान्य पिकवायचे ठरवले तर ते स्वावलंबित्व स्वागतार्ह ठरावे. अर्थात इतर अनेक अशी उत्पादने आहेत (चहा, मसाले इ.) की ज्यांच्यासाठी परस्परावलंबित्व अपरिहार्य आहे.

वास्तविक गाव समाज आपल्या दैनंदिन गरजा भागविण्यात बऱ्याच अंशी आत्मनिर्भर होता. अर्थातच अनेक सेवा, सुविधा व वस्तूंपासून हा समाज वंचित होता. परंतु विकास प्रक्रियेत केवळ हा अभाव दूर केला गेला नाही तर ज्या व्यवस्थामध्ये तो आत्मनिर्भर होता त्याही मोडकळीस आल्या व परस्पर सहकार्यातून अधिक उच्च जीवनमानाऐवजी तेथील समाज जीवनच परावलंबी झाले. कारण परस्पर सहकार्याऐवजी एकतर्फी शोषण व्यवस्था अस्तित्वात आली.

ही परावलंबी व्यवस्था कुठपर्यंत जाऊ शकते याचाही विचार केला पाहिजे. "यू. एस. व्हीट असोसिएशनने" भारतीय कंपन्यांच्या सहकार्याने दक्षिणेमध्ये 'अधिक गहू वापरा' मोहीम चालवली आहे. (इकॉनॉमिक टाईम्स २२-२-९६) अशी मोहिम उघडून तांदुळाऐवजी गव्हाचा खप वाढवायचा व दक्षिणेसारखा स्वयंपूर्ण विभागही परावलंबी करायचा हा प्रयत्न आहे. परस्परावलंबनात दोघांच्याही गरजा किंवा मर्यादित स्वार्थ साधला जातो, पण परावलंबी व्यवस्थेत निखळ स्वार्थ व शोषण असते हे स्पष्ट आहे. म्हणून आत्मनिर्भरतेचा विचार एका व्यापक परिप्रेक्ष्यात करणे हिताचे ठरेल.

५. वरील सादगी व स्वावलंबनाचा विचार पूर्णत्वाला न्यायचा तर तो अपरिहार्यपणे देशीयतेपर्यंत पोचतो. आपण पाश्चिमात्य जीवनशैली आणि पौर्वात्य जीवनशैली असे शब्द नेहमी वापरतो. पण पाश्चिमात्य जीवनशैली ही तेथील देशीय जीवनपद्धती आहे व पौर्वात्य जीवनशैली ही एतद्देशीय जीवनशैली आहे हे लक्षात घ्यावे लागेल. इथली जीवनशैली इथला निसर्ग, हवामान, मानवी संस्कृतीचा विकास क्रम यातून निर्माण झाली आहे. त्यामुळे ती इथे सुखाने जगण्यासाठी अधिक सुसंगत आहे. पण जित आणि जेत्याच्या मानसिकतेने, गुलामाच्या पारतंत्र्याच्या मानसिकतेने आणि भांडवली बाजारपेठेच्या आक्रमक शैलीने आपण ही नैसर्गिक देशीय शैली सोडून देतो. एका शिबिरात श्री. विलासराव साळुंखे

असे म्हणाले की जिथे जे पिकते तिथे ते खाणे हे अधिक आरोग्यकारक ठरते. महाराष्ट्रात ज्वारी बाजरी पिकते व इथल्या दमट उष्ण वातावरणात तीच आरोग्याला योग्य, पण आपण गहू खायला लागलो आणि अनारोग्याचे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. म्हणजे परिसरातील उत्पादनाचा वापर यातच देशीयता आहे.

एका अर्थाने स्वदेशी या शब्दात सादगी, स्वावलंबन व देशीयता या तिन्ही गोष्टी एकाच वेळी अभिप्रेत आहेत. स्वदेशी संदर्भात बाजाराची व्याप्ती कशी ठरवायची? कोणते उत्पादन स्वदेशी ठरवायचे? याचे प्रश्न निर्माण होतात. या संदर्भात 'ग्राम स्वराज्य' किंवा 'हमारे गांव में हमारा राज' या दोन संकल्पना मांडल्या जातात. गावाची स्वयंपूर्णता हा विचार मांडला की विकास प्रक्रियेबाबत व सामाजिक घुसळणीबाबत अनेक प्रश्न निर्माण होतात. मुळात गाव हा एकक अनेक प्रकारच्या उत्पादन व्यवस्थांना सामावून घेऊ शकत नाही व अर्थक्षमही ठरत नाही. म्हणून स्वदेशी आणि ग्रामस्वराज्य हे नातं नाकारणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे 'हमारे गाव में हमारा राज' ही मांडणी गावातील नैसर्गिक साधन स्रोतांच्या व्यवस्थापनामध्ये गावाचा सहभाग एवढ्यापुरती मर्यादित केली पाहिजे, ती उत्पादन व्यवस्थेला लावण्याचा प्रयत्नही अडचणीचा ठरेल.

यातून मार्ग म्हणजे परिसराभिमुख उत्पादन व विक्रीची संकल्पना पुढे येते. प्रत्येक वस्तूचे अर्थक्षम उत्पादनासाठी विशिष्ट प्रकारचे तंत्रज्ञान व विशिष्ट आकाराची बाजारपेठ आवश्यक असते. शिवाय ग्राहकाला निवडीचा वाव, लोकांना व्यवसाय बदल व स्थान बदलाची शक्यता यांचाही विचार करावा लागतो. हे लक्षात घेता प्रत्येक प्रकारच्या वस्तूसाठी वेगवेगळ्या विस्ताराच्या बाजारपेठा आवश्यक आहेत. त्या वस्तूप्रमाणे गावापासून, पंचक्रोशी तालुका, जिल्हा, राज्य, राष्ट्र, आंतरराष्ट्रीय इथपर्यंत ही बाजारपेठ वेगवेगळी असेल. याचा अर्थ प्रत्येक वस्तूच्या उत्पादनासाठी व विक्रीसाठी एक विशिष्ट परिसराची गरज असेल. वस्तूंचे उत्पादन त्याच्या परिसरातील बाजारपेठेची गरज लक्षात घेऊन तेवढेच केले जाईल व जनतेने आपल्या परिसरातील वस्तू वापरणे हितकारक ठरेल. या प्रक्रियेची अधिक तपशीलवार मांडणी स्वतंत्रपणे केली आहे.

६. सर्वप्रकारच्या नैसर्गिक संपत्तीचे, साधन स्रोतांचे व ग्रामीण भागातील वाढण्याचे व क्रयशक्तीचे, श्रीमंताकडे, शहराकडे व मुठभरांकडे हस्तांतरण होण्याची अखंड प्रक्रिया चालू आहे. ही प्रक्रिया अनेकांनी अनेक प्रकारे मांडलेली आहे. जर ग्रामीण भागातील क्रयशक्ती त्याच्या परिसरातच राहिली तर ग्रामीण भागाचा आर्थिक विकास घडून येईल. हीच प्रक्रिया घोषणेच्या पातळीवर "पैसा अडवा पैसा वाढवा" अशी मांडली आहे. याचीही अधिक तपशीलवार मांडणी करणे व त्यातील गुणदोष तपासून पहाणे आवश्यक आहे. पण स्वदेशीच्या नव्या चळवळीची दिशा व तिला व्यावहारिक रूप देण्याची शक्यता या दृष्टीने याचा विचार करावा लागेल.

विषयाची मर्यादा व वेळेची मर्यादा ह्या लक्षात घेता अनेक मुद्यांना स्पर्श केलेला नाही. उदाहरणार्थ या चर्चेत तंत्रशास्त्रा विषयी - खास करून जेनेटिक सायन्स, संगणक, माहिती वहन इत्यादीबाबत - काय भूमिका घ्यावी इत्यादी प्रश्न आहेत. अर्थशास्त्र हा अत्यंत गुंतागुंतीचा, गणिती व तांत्रिक विषय आहे व त्याचे अन्य विषयांशी असलेले संबंध व परिणाम विसरता येत नाहीत. या सगळ्यांचे भान ठेवूनही स्वदेशीची नवीन संकल्पना स्पष्ट व्हावी म्हणून हा प्रयत्न आहे.

■■■

# स्वदेशीवरील चर्चेत उपस्थित झालेले मुद्दे

*[ भारतीय अर्थविज्ञान वर्धिनीच्या चर्चागटाची नववी बैठक 'स्वदेशी व जागतिकीकरण' या विषयावर दिनांक २८ फेब्रुवारी १९९९ रोजी संस्थेच्या सेमिनार हॉलमध्ये आयोजित करण्यात आली होती. पत्रिकेच्या ह्या अंकात सादर केलेली बहुतांशी टिपणे चर्चागटाच्या सदस्यांना उपलब्ध करून देण्यात आली होती. ह्या चर्चेत उपस्थित करण्यात आलेल्या काही मुद्द्यांचे संकलन अर्थबोध पत्रिकेच्या वाचकांसाठी येथे सादर करीत आहोत. ]*

(१) स्वदेशीची संकल्पना जुनी असली तरी १९९० नंतर भारताने अर्थव्यवस्था खुली करंण्याच्या दृष्टीने काही धोरणात्मक बदल केले. त्या बदलांचे परिणाम उद्योग-व्यापार, बँका व वित्तपुरवठा करणाऱ्या संस्था, आयात-निर्यात ग्राहकोपयोगी वस्तूंची बाजारपेठ, या तसेच सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात जाणवले. या परिणामांमुळे भारतातील उद्योग, पर्यावरण, समाजजीवन अडचणीत येत असल्याचे मत समाजाच्या विविध क्षेत्रातून, विविध पातळ्यांवरून व्यक्त करण्यात येऊ लागले. व्यापार व अर्थव्यवहार या अतिशय गुंतागुंतीच्या प्रक्रिया होऊ लागल्या. त्यातूनच दक्षिण-पूर्व आशियातील आर्थिक पेचप्रसंगामुळे आर्थिक व्यवहार जगभरात एकमेकांशी किती व कसे बांधले गेले आहेत हेही स्पष्ट झाले. या पार्श्वभूमीवर जागतिकीकरणाला विरोध करण्याचे सूर उमटू लागले आणि स्वदेशीचे आग्रही प्रतिपादन करण्यात येऊ लागले. ही कारणमीमांसा अनेकांनी मान्य केली.

(२) स्वदेशी म्हणजे नेमके काय? याबाबत अनेक संकल्पना चर्चेत मांडण्यात आल्या. स्वदेशी म्हणजे 'स्व-देशाचे हित जपणे' यावर साधारणपणे एकमत असले तरी हित जपण्यासाठी होणाऱ्या व्यवहाराबाबतच्या (वस्तूंची, सेवांची देवघेव, इतर आर्थिक, औद्योगिक तसेच भांडवल व तंत्रज्ञानाविषयक होणारी उलाढाल इ.) संकल्पना व पद्धती यावर मतभेद असल्याचे आढळले. स्वदेशीच्या संबंधात मांडण्यात आलेल्या संकल्पना पुढीलप्रमाणे :

- स्वदेशी म्हणजे स्व-देशाचे हित व स्वार्थ साधला जाणे,
- 'भारतीय' व्यवस्था 'भारतीय' असली पाहिजे, (येथे व्यवस्था हा

शब्द सर्व अर्थाने, - राजकीय, सामाजिक व आर्थिक म्हणजेच सर्वसमावेशक म्हणून वापरण्यात आला आहे.)

- स्व-देश सर्वार्थाने सक्षम असणे,
- 'देशीयता' व्यवहारात वाढविणे,
- स्वदेशातील मानवी संसाधनांचा व इतर संबंधित बाबींचा सर्वकष विकास
- स्व-देशातील तळागळापासून सर्व स्तरातील व्यक्तिंचा विकास
- शोषणमुक्त व ग्राहकहित जपणारी अर्थव्यवस्था,
- जमीन, पाणी, वीज व इतर नैसर्गिक तसेच मानवनिर्मित मत्तांवर (Assets) स्व-देशातील नागरिकांचा हक्क असणारी व्यवस्था,
- समाजातील सर्व घटकांना श्रमाची व उत्पन्नाची संधी देणारी अर्थव्यवस्था.
- ही केवळ राजकीय व आर्थिक संकल्पना नाही तर त्याच्या सामाजिक व सांस्कृतिक बाजूंचाही विचार करणे अत्यावश्यक आहे.

**(३)** निवडक (Selective) जागतिकीकरण : अर्थशास्त्राच्या दृष्टीने उत्पादन प्रक्रियेतील चार मुख्य घटक (Factors of Production) भूमि (Land), श्रम (Labour), भांडवल (Capital) व उद्योजकता (Entrepreneurship) हे आहेत. त्यापैकी भूमि व श्रम यांचे जागतिकीकरण होत नसून भांडवल व उद्योजकता याच दोन घटकांचे जागतिकीकरण सध्या होत आहे. याकडे चर्चेत लक्ष वेधण्यात आले.

**(४)** भांडवल बाजाराचे जागतिकीकरण झाल्याने आपले भांडवलबाजार व अर्थव्यवस्था ही जागतिक घडामोडींना बळी पडण्याची शक्यता निर्माण होते.

**(५)** जागतिकीकरणामुळे वाढणाऱ्या व्यापारामुळे उभयपक्षी लाभ होऊ शकतो तथापि व्यवहारात सर्वकाळ तसेच घडते असे म्हणणे धाडसाचे ठरेल. हे लाभ मोजण्यासाठी आपण कोणत्या फूटपट्ट्या वापरतो, कोणते निकष वापरतो ते ठरविणे महत्वाचे आहे. भारतातील 'श्रमिक' (श्रमावर जगणारा) पूर्वी ज्या पातळीवर जगत होता त्या पातळीपेक्षा त्यांचे राहणीमान/जीवनमान वाढले की नाही हे तपासून बघण्याची गरज आहे. (पेप्सी पिणे किंवा वेशभूषेतील बदल हा राहणीमानाचा निकष नाही, याची

नोंद घ्यावी.) नुसत्याच उपभोगाच्या अथवा खरेदीशक्तीच्या नव्हे तर मानवी जीवनामध्ये गुणात्मक बदल होणे अपेक्षित आहे. पण तसे कमी प्रमाणावर होताना दिसते.

(६) जीवनाच्या सर्वच क्षेत्रांचे भांडवलीकरण/बाजारीकरण होत असून ते धोकादायक आहे. मानवता नष्ट करणारे, केवळ स्वार्थावर सामाजिक संबंध टिकविणारे भांडवलीकरण समाजाला कोणत्या दिशेला घेऊन जाईल ते सांगणे अवघड आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत १० ते १५ टक्के लोकांचा ८५ टक्के लोकांवर व नैसर्गिक आणि इतर साधन सामग्रीवर कब्जा होताना दिसत आहे. हे कितपत योग्य आहे?

(७) परकीय भांडवल वाईट असेलच असे नाही. पण आपण कोणत्या क्षेत्रात परकीय गुंतवणुकीला वाव देतो? त्यामुळे आपल्या उद्योगांचे, उद्योजकांचे, देशाचे किंवा समाजजीवनाचे काही नुकसान तर होत नाही याचा विचार करण्यात यावा. यासंदर्भात महात्मा गांधीजींचे एक वाक्य उदधृत करण्यात आले. स्वदेशीला महत्त्व देण्याबद्दल महात्मा गांधींजींना विचारण्यात आले की, "तुम्ही घराची दारे-खिडक्या बंदच ठेवणार का?" तेव्हा ते म्हणाले होते, "मी दारे खिडक्या एवढ्याच प्रमाणात उघडीन की त्या वाऱ्यामुळे मीच घरातून उडून जाणार नाही!"

(८) भांडवल बाजाराच्या जागतिकीकरणाबरोबरच नव्या उद्योगांची भांडवलसघनता वाढते. भांडवलसघनतेमुळे यांत्रिकीकरण वाढते व यांत्रिकीकरणामुळे रोजगार निर्मितीचे प्रमाण कमी होते, या बाबींवर अनेकविध बाजूंनी चर्चा झाली. मुळात या देशातील श्रमिकांना संधी मिळणे महत्वाचे आहे असे मत व्यक्त करण्यात आले. तसेच यांत्रिकीकरणामुळे बेरोजगार होणाऱ्यांच्या मार्गदर्शनाची, प्रशिक्षणाची व्यवस्था कोणती आहे, ती व्यवहार्य आहे की नाही अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यात यावीत, असेही म्हणण्यात आले.

(९) जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतील महत्वाचा घटक असलेल्या बहुराष्ट्रीय कंपन्यांना विरोध करणे व्यवहार्य नसेलही पण या कंपन्यांनी भारतातील कंपन्या भराभर विकत घेण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. देशी कंपन्यांचे विलीनीकरण (Mergers) करून त्यावर ताबा (Acquisition) मिळविण्याचा हा प्रयत्न आपल्या अर्थव्यवस्थेला घातक ठरू शकतो का,

याचा सखोल विचार करून तशी कृती करण्याची वेळ आली आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांकडे असलेला पैसा पाहता त्यांना येथील अवाढव्य कंपनीही विकत घेण्यास अडचण येत नाही. शिवाय अशा व्यवहारातून देशी उद्योगांना मिळणारा पैसा अपेक्षित असलेल्या प्रगतीशील उद्योगांसाठीच वापरला जाईल असे खात्रीने सांगता येत नाही. तेव्हा विलीनीकरणातून भारतीय उद्योग क्षेत्राच्या विकासाच्या दृष्टीने पाऊल पुढे पडते की नाही? उद्योग विकत घेण्याच्या प्रक्रियेतून देश तर विकला जात नाही ना? अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्याची गरज आहे.

**(१०)** आंतरराष्ट्रीय व्यापारात उभयपक्षी लाभ (Win-Win) होण्याची शक्यता कितपत असते? व्यापारात एकाचे नुकसान व दुसऱ्याचा लाभ अशीच स्थिती नेहमी किंवा बहुतकरून असते का? असली तर ती स्थिती कोणत्या कारणांमुळे असते? Market Imperfection मुळे असे होते का? व्यापारात उभयपक्षी लाभ होत असेल तर अशा वेळी व्यापारावर निर्बंध न घालता व्यापारी प्रक्रियेतील वेगावर नियंत्रण घालता येणे शक्य आहे का? यादृष्टीने उपाय शोधण्यात यावेत असेही मत मांडण्यात आले.

**(११)** आंतरराष्ट्रीय व्यापाराची गरज का निर्माण होते हा महत्त्वाचा प्रश्न आहे. एखादी वस्तू एखाद्या देशाला हवीच असेल आणि ती वस्तू त्या देशात तयार करण्याची किंमत (Cost of Production) जर आयात किंमतीपेक्षा (Import Price) महाग असेल तर ती वस्तू आयात करणे परवडू शकते. तेव्हा आंतरराष्ट्रीय व्यापारात सहभागी देशांना होणाऱ्या फायद्या-तोट्यांच्या बाबतीत तीन शक्यतांचा विचार केला पाहिजे.

१) उभयपक्षी फक्त लाभ

२) एकाचा फक्त लाभ / दुसऱ्याचा फक्त तोटा

३) एकाचा लाभ / दुसऱ्याचा लाभ आणि तोटा.

यापैकी उभयपक्षी फक्त लाभ होत असेल तर आंतरराष्ट्रीय व्यापार फायद्याचाच आहे असे म्हणावे लागेल व त्यास विरोध करण्यास काहीच हशील नाही.

एकाचा फक्त लाभ दुसऱ्याचा फक्त तोटा असेल तर तोटा होणाऱ्याने हा व्यापार करू नये असे म्हणता येईल. (प्रश्न असा आहे की हा निर्णय घेणे हे केवळ त्या देशाच्या इच्छेवर अवलंबून असते का?)

तिसरी जी बाब आहे की एकाचा लाभ होतोच, दुसऱ्याचा मात्र लाभही होतो आणि तोटाही होतो तेथे फार विचारपूर्वक निर्णय घ्यावा लागेल. नेमका कोणत्या वस्तू / सेवांबाबत वा बाबींबाबत लाभ किंवा तोटा होतो आहे ते तपासले पाहिजे.

आंतरराष्ट्रीय व्यापाराबाबत दोन देशांचा आपण विचार करू उदा. अमेरिका व भारत. तेव्हा दोन गोष्टी अशा लक्षात येतात की अमेरिकेत भांडवल विपुल असून श्रम दुर्मिळ आहेत. तर भारतात भांडवल दुर्मिळ असून श्रम विपुल आहेत. अर्थशास्त्रीय दृष्टीकोनातून असे म्हणता येते की भांडवल प्रधान तंत्र वापरले तर 'भांडवल' या घटकाचे प्रमाण वाढते व श्रमप्रधान तंत्र वापरले तर श्रम या घटकाचे उत्पन्न वाढते. तेव्हा आंतरराष्ट्रीय व्यापारात कोणत्या घटकाचे प्रमाण वाढते आहे ते बघून ती वाढ आपल्या देशाला योग्य आहे किंवा नाही, हा विचार करून तारतम्याने आंतरराष्ट्रीय व्यापार फायदेशीर ठरतो की नाही ते बघितले पाहिजे.

ह्याच कारणामुळे अमेरिकेतील श्रमसंघटनांनाही मुक्त व्यापार नकोच आहे कारण त्यांच्या देशात श्रम दुर्मिळ असल्याने श्रमाला मिळणारे वेतन जास्त आहे. श्रमाचा आंतरराष्ट्रीय व्यापार झाला तर त्यांना स्पर्धा उत्पन्न होईल व तेथील श्रमिकांना असणारी मागणी तेवढीच राहिली तरी तेथील श्रमिकांचा मोबदला कमी होईल. त्यामुळे त्यांच्या वेतनावर परिणाम होऊ शकतो. स्वदेशी व जागतिकीकरणाचा विचार करताना संरक्षित व्यापार (Protected Trade) की खुला व्यापार (Free Trade) हा खरा महत्त्वाचा मुद्दा ठरतो. (Protectionist) असण्यातील फायदे तोटे देखील ही समजून घेतले पाहिजेत. तेव्हा सर्वबाजूंचा सर्वंकष विचार केला पाहिजे. कोणतीही बाजू समजून न घेता, ती फायद्याची आहे की नाही हे न बघताच एक बाजू उचलून धरणे योग्य ठरणार नाही.

■■■

# राजीव दीक्षितांची स्वदेशी : अर्थ आणि वैयर्थ्य

## श्री. राजीव साने

*[ आझादी बचाओ आंदोलनाचे प्रवक्ते व नेते श्री. राजीव दीक्षित हे 'स्वदेशी' विचारसरणीचे खंदे पुरस्कर्ते आहेत. पुण्या-मुंबईसकट महाराष्ट्रात अनेक ठिकाणी अनेक संस्था-संघटनांद्वारे त्यांची भाषणे व दौरे आखले जात आहेत. त्यांच्या विशिष्ट पद्धतीच्या वक्तृत्वाची मोहिनी पडून महाराष्ट्रात ठिकठिकाणी त्यांच्यामागे अनुयायी गोळा झालेले दिसतात. मात्र त्यांच्या भाषणाचे साक्षेपाने विश्लेषण केल्यास त्यात अनेक गंभीर त्रुटी, आक्षेपार्ह शेरे, व आकड्यांची जादूगिरी आढळून येते. ही वस्तुस्थिती लोकांसमोर येणे आवश्यक आहे. ह्या भूमिकेतून श्री. राजीव साने ह्यांच्या किस्त्रीम १९९८ च्या दिवाळी अंकातील 'ज्वलंत स्वदेशी - साधक आणि बाधक' ह्या लेखातील काही भागाचे संकलन करून अर्थबोध पत्रिकेच्या वाचकांसाठी सादर करीत आहोत. हे संकलन करताना श्री. राजीव दीक्षितांची मते किंवा दावे व त्यावरील श्री. राजीव साने ह्यांची टिप्पणी असा आकृतीबंध स्वीकारला आहे. ]*

आपली लेखामागची भूमिका स्पष्ट करताना श्री. राजीव साने म्हणतात, श्री. राजीव दीक्षित हे आपल्या दिलखेचक वक्तृत्वाने लोकप्रिय होत गेल्याने स्वदेशीवाद म्हणजे जणू काही राजीव दीक्षितांचे 'सिद्धांत' असा समज पसरत चालला आहे. असे होणे हे जागतिकीकरणाच्या प्रामाणिक टीकाकारांना व गंभीर स्वदेशीवाद्यांनाच हानीकारक आहे.

श्री. साने पुढे म्हणतात, "दीक्षितांनी (आपल्या वक्तृत्वाचे) एक अफाट रसायन बनविले आहे. काही अतिरंजित, काही धादांत खोटे, काही सूडभावनेने व द्वेषभावनेने पछाडलेले, काही फॅसिस्ट हुकूमशाहीचा पुरस्कार करणारे, काही आधुनिकताच नाकारणारे, काही अफवा व घबराट पसरवणारे, सभ्यतेला सोडून नेत्यांची अवहेलना करणारे, प्रस्थापित नोकरशाही - मक्तेदारी हितसंबंधांना जपणारे, अंधश्रद्धा जोपासणारे.. असे बरेच काही या रसायनात आहे." आपल्या अभिनिवेशाच्या भरात दीक्षित अनेक घोटाळे करतात. ज्या विदेशी उत्पादनांवर बहिष्कार घालावयाचा ती उत्पादनेच कशी रद्दी, विषारी व अमंगल आहेत हे सिद्ध करण्यात दीक्षित आपला बराच वेळ व शक्ती खर्च

करतात. पाश्चात्यांची द्राक्षं आंबट कशी आहेत हे सिद्ध करण्यात ते विज्ञानाचा हकनाक बळी देतात.

**दीक्षितांच्या दाव्यातील वैज्ञानिक घोटाळ्यांची उदाहरणे :**

**दीक्षित म्हणतात** : पेप्सीकोला विषारी व जहाल आहे. पेप्सीकोलातून कार्बन डाय ऑक्साईड हा विषारी वायू पोटात जातो. पेप्सीमध्ये दात बुडवून ठेवला तरी तो विरघळून जातो.

**टिप्पणी :** यातील वैज्ञानिक घोटाळा असा की मुळात कार्बन डाय ऑक्साईड हा विषारी वायू नाही. कार्बन मोनॉक्साईड हा वायू विषारी आहे. कार्बन डाय ऑक्साईड हा आपल्या (शरीरातील) चयापचयाचा (digestive system) अविभाज्य घटक आहे. तो कोणाच्याही शरीरात असतोच. केवळ पेप्सीतूनच तो शरीरात जातो असे नाही. दीक्षित ज्याला सात्त्विक मानतात असे दूध प्यायल्यावरही कोणाच्याही जठरातील हायड्रोक्लोरिक आम्लाशी संयोग होऊन तो तयार होतोच. पित्त झाल्यावर जो खाण्याचा सोडा देतात त्यानेही हा वायू तयार होतोच. पण दीक्षितांच्या जगात पेप्सी पिण्याच्या स्पर्धेत भाग घेणारे दोन कॉलेजयुवक तासात नऊ-दहा बाटल्या प्यायल्याने चक्क मरतात! विशेष म्हणजे त्यांना तातडीने ज्या डॉक्टरकडे नेले जाते तो डॉक्टरही म्हणतो "आता यांना वाचवणे अशक्य आहे कारण शरीरात बराच कार्बन डाय ऑक्साईड शिरलाय." दीक्षितांच्या मते विज्ञान सांगते की हा वायू 'बाहेर' सोडावा (विज्ञान असले आदेश देत नाही ते फक्त फुफ्फुसाची क्रिया उलगडून दाखवते) पण सोडा पिणारे मठ्ठ आधुनिक लोक तो म्हणे 'आत' घेतात. दीक्षितांना, पचनसंस्थेत 'आत' घेणे आणि श्वसनसंस्थेत आत घेणे यातल्या फरकाचे भानही रहात नाही. जर कार्बन डाय ऑक्साईड आरोग्याला घातक असेल तर अस्सल देशी कुटिरोद्योगी 'गोटी छाप' सोड्यातही तो असतोच, फक्त विदेशी शीतपेयात नव्हे.

**दीक्षित म्हणतात :** एक कप चहा-कॉफीत एका सिगारेट एवढे निकोटीन असते म्हणून ते आरोग्याला घातक आहे. थंड देशात मात्र चहा-कॉफी जीवनावश्यक आहे.

**टिप्पणी :** यातील वैज्ञानिक चूक अशी की एक कप चहा-कॉफीत एवढे निकोटीन नसते ही पहिली गोष्ट. दुसरे म्हणजे जर युरोपातील

लोकांसाठी ती जीवनावश्यक वस्तू असेल तर भारतातील लोकांवर त्यामुळे मृत्यू कसा ओढवेल? बरे चहा कॉफी बंद केल्यावर मळ्यातल्या मजुरांच्या रोजगारीचे काय? त्यावर दीक्षितांचे उत्तर आहे. "हंड्रेड परसेंट एक्सपोर्ट कर देंगे!" आता पंचाईत अशी होते की पाश्चात्य देश त्यांचा घातक माल आपल्याकडे 'डंप' करतात म्हणून खलनायक ठरतात, मग आपणही तेच करायचे? या नैतिक पेचाला दीक्षितांकडे 'वैज्ञानिक' उत्तर आहे. थंड देशात म्हणे चहा कॉफी जीवनावश्यक आहे, ते लोक चहा कॉफी विना मरतील! खरे तर चहा कॉफी सापडण्यापूर्वी युरोपखंड होतेच. पण दीक्षितांच्या जगात युरोपात चहा-कॉफीविना जगता येत नाही व भारतात मात्र हमखास मृत्यु ठरलेला!!

**दीक्षित म्हणतात** : कोलगेट कंपनी पेस्टसाठी लागणारे कॅल्शिअम् फॉस्फेट मेलेल्या जनावरांच्या हाडांच्या चुऱ्यापासून मिळविते ते भारतीयांचे ख्रिश्चनीकरण करण्यासाठी. शिवाय मेलेल्या जनावरांच्या घटकाने श्वासदुर्गंध कसा कमी होईल?

**टिप्पणी** : मुळात मेलेल्या जनावरांची दुर्गंधी, त्यांच्या हाडांचा कारखान्यात केलेला चुरा, व श्वासदुर्गंध ह्यांच्यात अर्थाअर्थी काहीही संबंध नाही. दुसरे म्हणजे कॅल्शिअम् फॉस्फेट मिळविण्याची ही पद्धत चुकीची असली तरी टूथपेस्ट तयार करणाऱ्या स्वदेशी कंपन्या तीच पद्धत वापरत नसतील हे कशावरुन? तिसरे म्हणजे परदेशी कंपन्या हाडांच्या चुऱ्याचा वापर नफ्याकरता न करता ख्रिश्चनीकरणासाठी करतात तर स्वदेशी कंपन्यांचा नक्की हेतू काय?

**दीक्षित म्हणतात** : विदेशी कंपन्यांची सर्व औषधे ही जालिम विषे या सदरात मोडतात. जपानमध्ये अडीच लाख मुले पॅरासेटेमॉल (क्रोसिन) मुळे पोलिओची शिकार होऊन अपंग होतात. इबुप्रोफेन (ब्रुफेन) हे वेदनाशामक - सूजनिवारक फक्त १ मिलिग्रॅम पुरते. पण या विदेशी कंपन्या भारतीयांचे वाटोळे करण्यासाठी २५० व ४०० मिलिग्रॅमच्या गोळ्या तयार करतात.

**टिप्पणी** : वास्तव जगात पोलिओचे जंतू असतात व लसही असते. पॅरासेटेमॉलमुळे अपंगत्व येण्याची एकही केस घडताना आपल्याला तरी दिसत नाही. इबुप्रोफेन (ब्रुफेन) हे वेदनाशामक - सूजनिवारक हे

दीक्षितांच्या जगात आराम पडायला फक्त एक मिलिग्रॅम पुरेसे असते. पण वास्तव जगात गोळ्या मिळतात २५० व ४०० मिलिग्रॅमच्या. दीक्षितांच्या मते जास्त माल खपावा म्हणून हे ओव्हरडोसिंग केले जाते. वास्तव जगातील कंपनी कसा विचार करेल, "मला जर तेवढेच मूळ औषध वापरून चारशेपट गोळ्या विकता येणार आहेत तर मी ते एकाच गोळीत का खर्ची पाडू?" पण हा झाला नफ्याचा विचार. दीक्षितांच्या जगातील कंपन्या नफ्यासाठी नव्हे तर कसेही करून भारतीयांचे वाट्टोळे करायचे याच उद्दिष्टासाठी कार्यरत असतात.

**दीक्षित म्हणतात :** जगात दर पाचशे सिगारेट्ससाठी जो कागद लागतो तो कागद बनविण्यासाठी एक झाड तोडले जाते.

**टिप्पणी :** मी (श्री. साने यांनी) एक प्रयोग करून पाहिला. दहा सिगरेटींचे एक पाकीट न फोडता ताजव्यात टाकले. पाकीट, जिलेटिन, रॅपर, चांदी, फिल्टर, कागद, तंबाखू या सगळ्या सकट वजन भरले वीस ग्रॅम. तंबाखूसकट सगळेच वजन मी कागदाचेच मानले. तरीही पाचशे सिगरेटींचा कागद हा एक किलो वजनाचा भरला. मग एक किलोसाठी आख्खे झाड तुटते म्हणायचे काय?

दीक्षितांच्या मते हे एक किलो वजनाचे झाड (बोन्साय?) पंधरा लाख रुपयाचा ऑक्सिजन देते. किती कालावधीत किती वजनाचा, ते दीक्षित सांगत नाहीत. ऑक्सिजनचा भाव काय लावला? पेशंटला जो सिलेंडर लावतात त्या भावाने? दीक्षितच जाणोत.

बरे हा एवढा नुकसान करणारा अपव्यय 'आय.टी.सी.'च करते कारण ती विदेशी (कंपनी) आहे. 'वझीर सुल्तान' नव्हे, कारण ती स्वदेशी (कंपनी) आहे म्हणजे विल्सच्या कागदासाठी झाडे तुटतात पण चारमिनारच्या कागदासाठी नाही असे समजायचे काय?

**दीक्षित म्हणतात :** फ्रीजमधले पाणी प्यायल्याने मलावरोध होतो. इतका की युरोपातील ९०% जनतेला चार चार दिवस संडासला होत नाही. कारण ते फ्रीजमधले पाणी पितात.

**टिप्पणी :** पण तरीही दीक्षितांच्या जगात रेफ्रिजरेशनची खरी गरज युरोप - अमेरिकेसारख्या थंड देशांनाच आहे. भारतासारख्या उष्ण देशांना नाही, त्याची शास्त्रीय कारणे अ) तेथील स्त्रिया आपल्या

स्त्रियांसारख्या रोजच्या रोज गरम गरम स्वयंपाक करून वाढणाऱ्या नाहीत. ब) आपल्यासारखी सुपीक जमीन नसल्याने ताजी भाजी मिळत नाही. दीक्षितांच्या मते पाश्चात्यांनी केल्व्हिनेटर ही कंपनी भारतात मुद्दाम धाडली. कधी धाडली? तर त्यांना जेव्हा हा शोध लागला की रेफ्रिजरेशनमुळे क्लोरोफ्लुरो कार्बनचे उत्सर्जन होते, त्याने वातावरणातील ओझोनचा क्षय होतो, अतिनील किरणांचा मारा वाढतो. वास्तवात हा ओझोन वगैरे शोध लागण्याअगोदरपासूनच केल्व्हिनेटर भारतात आहे. दीक्षितांच्या जगात ओझोनचेसुद्धा राष्ट्रवादी झोन असतात. भारतातील फ्रीजमुळे भारतावर भोक पडेल, पाकिस्तानातील फ्रीजमुळे पाकिस्तानावर!

दीक्षितांच्या जगातील भारताला हे तंत्र (रेफ्रिजरेशनचे) पाचशे वर्षापूर्वीच अवगत होते. (पंप नव्हता, काँप्रेसर नव्हता, रेफ्रिजरेशन मात्र होते!) ते निरूपयोगी व घातक म्हणून म्हणे ते आपण टाकून दिले. गरजच नव्हती तर अवगत कशाला केले? माहीत नाही.

**गणिती व अर्थशास्त्रीय घोटाळ्यांची उदाहरणे :**

**दीक्षित म्हणतात :** पेप्सी कंपनी २४० कोटी रूपये नफा मिळवते. एवढ्या पैशात पिण्याचे पाणी नसणाऱ्या खेड्यांचा, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटू शकेल, अशी दोन लाख गावे आहेत.

**टिप्पणी :** दोन लाख गावांसाठी २४० कोटी रूपये म्हटले तर प्रत्येक गावाच्या वाट्याला फक्त बारा हजार रूपये येतात. बारा हजार रूपयात गाव टँकरमुक्त होणे सोडाच पण वर्षभरासाठी टँकरचे भाडे सुद्धा भागणार नाही. पेप्सी न पिणाऱ्यांचे वाचलेले पैसे खेड्यांकडे कसे जाणार याची योजना दीक्षित सांगत नाहीत. सध्या पेप्सीवरील करातून सरकारला जे उत्पन्न होते ते तिकडे वळण्याची सैद्धांतिक शक्यता तरी आहे.

**दीक्षित म्हणतात :** पेप्सीच्या एका बाटलीमागे उत्पादनखर्च फक्त ७० पैसे असतो व नफा ७ रुपये असतो. (याला ते सौगुना म्हणतात. खरा हा दसगुनाच आहे. 'स्लिप ऑफ, टंगसुद्धा' अतिशयोक्तीच्या दिशेनेच होते.)

**टिप्पणी :** आता आपण ताळा करून पाहू. बाटलीमागे सात रु. नफा असेल तर २४० कोटी रूपये नफ्यासाठी किती बाटल्या खपतील? तर सुमारे ३४ कोटी. भारतात शीतपेयाचा ग्राहकवर्ग १७ कोटीच मानला

तरी दर ग्राहकामागे वर्षाकाठी फक्त दोनच बाटल्या खपतात (मिरांडा, सेव्हन अप वगैरेसह) हे हास्यास्पद आहे. ही विसंगती येते याचे कारण दीक्षित एक्साईज, सेल्सटॅक्स, ट्रान्सपोर्ट, स्टोअरेज, हॉटेलवाला या सर्वांचे वाटे जमेस धरत नाहीत. त्यांचे गणित जर खरे असते तर पार्ले कंपनीने स्वतःकडे थम्सअप असताना पाच रुपयात विकून पेप्सीला पराभूत का केले नाही? अजूनही आपण हिंदकोला नावाचे पेय काढून पेप्सी व कोका यांचे उच्चाटन करू शकू.

**दीक्षित म्हणतात :** भारताच्या एकूण मालवाहतुकीपैकी साठ टक्के माल वाहतूक बैलगाडीने चालते, जर बैलगाडीच्या चाकाला बॉलबेअरिंग बसवले तर ही वाहतूक ८० टक्क्यांवर जाईल व त्यामुळे तेलसंचय निधी तूट (ऑईल पूल डेफिसीट) नष्ट होईल.

**टिप्पणी :** बैलगाडीचा वेग बैलांचे खूर आणि रस्ता यातील घर्षणाने मर्यादित होतो. बेअरिंगमुळे तो वेग वाढणार नाही. सध्याच्या औद्योगिक युगात तर ८० टक्के वाहतूक बैलगाडीने करायची हे शक्यही नाही. पुन्हा बॉलबेअरिंग हे 'एसकेएफ्' या विदेशी कंपनीकडून घ्यायचे की गावातील लोहाराकडून बनवून घ्यायचे? अर्थात मुळात बैलगाडीने साठ टक्के वाहतूक होते ही आकडेवारीच खरी नाही त्यामुळे पुढचे सगळेच कल्पित ठरते.

**दीक्षित म्हणतात :** १८५० च्या सुमारास भारताचा जगातील एकूण निर्यातीत ३३% वाटा होता. (आता हा ३३% वाटा त्यांनी कशाच्या आधारावर निश्चित केला हे माहीत नाही.) आज तथाकथित स्वातंत्र्य असूनही हा वाटा फक्त ०.०१ टक्केच उरला आहे. (हे ही खरे नाही तो ०.६ च्या वर आहे.) ते पुढे म्हणतात की एकटी ईस्ट इंडिया कंपनी जेवढी लूट करत होती त्याच्या हजारोपट लूट आज ४००० विदेशी कंपन्या करीत आहेत.

**टिप्पणी :** आता निर्यात जर ०.०१ टक्के उरली असेल तर लूट कशाची करतात? निर्यात हे लुटीचे द्योतक आहे की उत्पन्नाचे? यावर दीक्षितांची ठाम भूमिका नाही. खरी गोष्ट अशी आहे की गेल्या पन्नास वर्षात प्रगतदेशातील आपापसातील व्यापाराचेच प्रमाण इतके वाढले आहे की त्यापुढे अप्रगत देशांचा आंतरराष्ट्रीय व्यापार खूप कमी दिसत आहे.

दुसरे असे की निर्यात वाढणे हे उत्पन्नाचे द्योतक आहे. आपण आपली निर्यात वाढवू शकलो नाही याची वेगळी कारणे आहेत. जगाची एकूण निर्यात ही गोष्ट पैशाच्या भाषेतच (मनी टर्म्स) मोजता येते. १८५० साली जगातली त्यावेळची स्वतंत्र व प्रगत राष्ट्रे जो काय व्यापार करत असतील, त्याचीही बेरीज पैशाच्याच भाषेत करावी लागेल. स्वतंत्र व प्रगत राष्ट्रे जे काय व्यापारी उत्पन्न मिळवत होती त्यांना बेरजेत घेऊनच त्या काळची 'एकूण निर्यात' ही रक्कम काढता येईल. परंतु भारतासारख्या गुलाम देशाला या रक्कमेत ३३% वाटा मिळत असेल हे कसे शक्य आहे? पैशाच्या भाषेत ३३% वाटा ही परम वैभवाची अवस्था आहे!

पण ब्रिटिश हे जर सरळसरळ लूटच करत होते. तर भारताच्या मालाला ते इतके प्रचंड भाव कसे देत होते? तेव्हा सक्तीची निर्यात असूनही प्रचंड भाव मिळत होते व आता निर्यात न करण्याचे स्वातंत्र्य असूनही मातीमोल भाव मिळत आहेत यावर कोण विश्वास ठेवील?

म्हणजेच दीक्षितांना असे म्हणावे लागेल की भारताचा निर्यातवाटा शून्य होता पण ज्या वस्तू जात होत्या त्यांना दीक्षितांना अभिप्रेत असलेले मूल्य चिकटवले तर तो ३३% भरला असता! असे मानले तरच ती निर्यात, हे लुटीचे द्योतक ठरेल. पण निर्यात हे जर तुम्ही लुटीचे द्योतक मानता तर ती घटून ०.०१ टक्के उरली याचे दुःख कसले मानता? आता लूट फारच कमी झाली आहे असे तरी म्हणा!

**दीक्षित म्हणतात :** भारतात राष्ट्रीय उत्पन्नाच्या म्हणजे आठ लाख कोटी रुपयांच्या २४ टक्के बचत होते. या मानाने परकीय गुंतवणुकीचा ओघ नगण्य आहे. (जर नगण्य आहे तर दीक्षितांनी चिंता का करावी?) तेच पुढे म्हणतात, या परकीय कंपन्या ५ टक्केच भांडवल बाहेरून आणतात, बाकीचे ९५% भारतीय भागधारकांकडूनच मिळवितात. हे जर खरे असेल तर मग त्या 'परकीय' कितपत ठरतील? दीक्षित असाच घोटाळा भांडवलाच्या गुंतवणुकीबाबतही करतात. ते म्हणतात की जेव्हा प्रगत देशांकडून अप्रगत देशांकडे ५०० अब्ज डॉलर भांडवल जाते तेव्हा अप्रगत देशांकडून प्रगत देशांकडे उलट ७२५ अब्ज डॉलर भांडवल जाते. दीक्षित यांच्याही पुढे जाऊन असे अफाट विधान करतात की "प्रगत

देशात प्रचंड मंदी आहे. आपली मंदी घालवण्यासाठी त्यांनाच अप्रगत देशांकडून भांडवल हवे आहे." मंदी या शब्दाचा अर्थच येथे विपर्यस्त केला जात आहे.

**टिप्पणी** : उलट स्वदेशीवादाचे भांडण असे आहे की भागधारकांत ५०% पेक्षा अधिक भाग परकीयांना देऊ नका म्हणजे स्वकीयांचे कंपनीवर नियंत्रण राहील. दीक्षित मात्र उलट सांगतात की या कंपन्यांशी लढायचा एक मार्ग असा की त्यांचे शेअर्स घेऊ नका. मग या कंपन्यांवरील नियंत्रण परकीयांकडे जाणार नाही काय? खरे असे आहे की प्रगत देशात होणारी बाह्य भांडवलाची आवक ही अप्रगत देशात होणाऱ्या आवकीपेक्षा जास्त आहे. पण ती जास्त असण्याचे कारण प्रगत देश एकमेकांत गुंतवणूकी करतात हे आहे. (प्रगत देश एकमेकांत गुंतवणूकी करून शिवाय वर अप्रगत देशांतही गुंतवणूकी करतात.) "प्रगत देशांकडे बाहेरून आलेले" याला "अप्रगत देशांकडून आलेले" असा साफ चुकीचा अर्थ ते चिकटवतात. जेव्हा भांडवलबाजारात मंदी असते तेव्हा अतिरिक्त भांडवलाला बाहेर जाण्याची वाट (व्हेंट फॉर सरप्लस) हवी असते. गुंतवणूकीला वाव नाही म्हणून मंदी आहे आणि शिवाय वर बाहेरून गुंतवणूक हवी आहे हे कसे शक्य आहे? आणि समजा हवी असती तरी अप्रगत देश ती कोठून करणार? जर इतकी प्रचंड गुंतवणूक ते करू शकत असते तर त्यांना अप्रगत म्हणताच आले नसते !

■■■

# भारतीय अर्थविज्ञान वर्धिनी

इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी ही संस्था प्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ कै. वि. म. दांडेकर यांच्या पुढाकाराने १९७० साली स्थापन करण्यात आली. या संस्थेचे उद्देश पुढीलप्रमाणे आहेत.

(अ) भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे; (ब) अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयाचे ज्ञान व माहिती देणे; आणि (क) इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयावरील साहित्य/पत्रके/पुस्तिका योग्य नमुन्यात तयार करुन प्रकाशित करणे.

१९८९ सालापासून "भारताचा आर्थिक, सामाजिक, राजकीय विकास" ह्या विषयाला वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक (जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी) संस्थेतर्फे चालवले जाते. त्याचबरोबरीने संस्थेतर्फे वेळोवेळी विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यासारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. त्याशिवाय विविध विषयांवर सामान्य वाचकाला ज्ञान देणाऱ्या छोट्या छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

---

## संस्थेचे मंडळ


नीळकंठ रथ, अध्यक्ष
कुमुदिनी दांडेकर
रामदास होनावर
स.वा. कोगेकर
आनंद नाडकर्णी
एम. व्ही. नाडकर्णी
के. एन. राज
सत्यरंजन साठे
ए. वैद्यनाथन
सु. म. विद्वांस
डी. सी. वधवा
सुनीती राव
सुबोध वागळे, प्रभारी संचालक

# भारतीय अर्थविज्ञान वर्धिनी, पुणे १६

अर्थबोध पत्रिका अंक ३ व ४, एप्रिल १९९९

**'स्वदेशी व जागतिकीकरण' विशेषांक**

(केवळ खाजगी वितरणासाठी)

---

**बुक पोस्ट / छापील पुस्तिका**

---

**प्रेषक:**

भारतीय अर्थविज्ञान वर्धिनी,

'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट रोड, पुणे ४११ ०१६.

फोन : ३५७१३२ / ३५७२१०

e-mail : ispepune@pn2.vsnl.net.in